



# सरकारच्या प्रतिमेत काही जमा, काही खर्च

– विजय नाईक, नवी दिल्ली

> **येत्या १५ जुलै रोजी परराष्ट्र मंत्री एस.एम.कृष्णा इस्लामाबादला भेट देऊन पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री शहा महंमद कुरेशी यांच्याबरोबर चर्चा करणार आहेत. या घटनांकडे पाहिल्यास गेले काही महिने भारत व पाकिस्तान, अमेरिका व चीन या राष्ट्रांशी उच्च पातळीवरून सातत्यानं संवादप्रक्रिया सुरू असलेली दिसते.**

संसदेचे पावसाळी अधिवेशन जवळ आले आहे. २६ जुलै रोजी ते सुरू होईल. यंदा पडलेल्या जबरी उन्हाळ्यानं सर्वांना जेरीस आणलं. जून सरता सरता पेट्रोल, डिझेल, केरोसीन व घरगुती गॅसच्या किमती भरमसाठ वाढल्याने गरीबाबरोबर सामान्य माणूस पुरता दबून गेलाय. मे मध्ये चलन फुगवट्याचे प्रमाण १०.१६ टक्के झाले. गेल्या १९ महिन्यातील हा उच्चांक आहे. अन्नधान्याच्या किमतीतील फुगवट्याचे प्रमाण शिगेला १६.४९ टक्क्यांवर जाऊन पोहोचले. ५ जुलै रोजी डावी आघाडी, बिजू जनता दल, तेलगू देसम, अण्णा द्रमुक, इंडियन नॅशनल लोकदल यांनी देशव्यापी बंद पाळला. भारतीय जनता पक्षानेही आंदोलन छेडले. येत्या २७ जुलै रोजी रिझर्व बँक पत धोरणाचा पहिल्या तिमाहीचा आढावा जाहीर करील. त्याबरोबर, दर व चलनवाढ आटोक्यात आणण्यासाठी काही उपाययोजनाही जाहीर करील. दरम्यान,



*जी–२० गटाच्या शिखर परिषदेत टोरांटो येथे भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी आवर्जून एकमेकांची भेट घेऊन चर्चा केली तो हा क्षण.*

युनियन कार्बाईडमधील वायुगळतीनंतर तब्बल २५ वर्षांनी पुनश्च उठलेला मोबदल्याचा वाद, कंपनीचे भारतातील माजी संचालक वॉरेन अँडरसन यांना भारतात आणण्याची मागणी, अशांत जम्मू व काश्मीर, नक्षलवाद्यांनी चालविलेले केंद्रीय राखीव दलाच्या जवानांचे हत्याकांड, आदी घटनांनी अधिवेशन दणाणणार.

पहिले काही दिवस दोन्ही सभागृहे या गदारोळात वारंवार स्थगित होतील, यात शंका नाही. त्यामुळे कोणत्या राष्ट्रीय मुद्यांवर गंभीर चर्चा होणार व कोणते सरकारी कामकाज पार पडणार, याचा नेमका अंदाज देता येणार नाही. परंतु, गेल्या महिन्यात परराष्ट्रीय पातळीवर चीन, अमेरिका व पाकिस्तान या तीन देशांच्या दिशेने सरकारची ठोस पावले पडली, ही जमेची बाब. राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांची चीन भेट व राष्ट्राध्यक्ष हु जिंताव यांच्याबरोबर झालेली चर्चा, वॉशिंग्टनमध्ये उच्चपातळीवरील व्युहात्मक वाटाघाटीत परराष्ट्र मंत्री एस.एम.कृष्णा व अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री हिलरी क्लिंटन यांच्यादरम्यान झालेली चर्चा, त्यावेळी अध्यक्ष बराक ओबामा यांनी चर्चास्थाळाला अचानक दिलेली भेट व केलेले भारताला सुखावणारे वक्तव्य उल्लेखनीय ठरले.

मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील मुख्य सूत्रधार डेव्हिड हेडली यांची भारतीय गुप्तचर संघटनेच्या अधिकाऱ्यांनी शिकागो येथे जाऊन घेतलेली जबानी, २४ ते २६ जून दरम्यान गृहमंत्री पी.चिदंबरम व पाकिस्तानचे अंतर्गत कारभार मंत्री रहमान मलिक, परराष्ट्र

*अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्री हिलरी क्लिंटन आणि भारताचे परराष्ट्रमंत्री एस. एम. कृष्णा यांनी वॉशिंग्टन येथील व्युहात्मक वाटाघाटीत भाग घेऊन चर्चा केली.*



सचिव श्रीमती निरूपमा राव व पाकिस्तानचे परराष्ट्र सचिव सलमान बशीर यांच्या इस्लामाबादमधील भेटीगाठी, या घटनाही महत्वपूर्ण ठरतात. विशेष म्हणजे, केंद्रीय गुन्हा अन्वेषण विभाग (सीबीआय) व पाकिस्तानची संघीय गुन्हा अन्वेषण संस्था यांच्या संचालकांदरम्यान दहशतवादाला आळा घालण्यासाठी झालेली बातचीत आदींवरून सरकारची पावले पुढे पडल्याचे दिसते. दोन्ही देशांदरम्यान असलेला 'दहशतवादप्रतिबंधक संयुक्त' गट २६/११ च्या हल्ल्यांनतर शीतपेटीत पडला आहे. त्यानंतर गुन्हा अन्वेषण विभागांच्या संचालकांची झालेली भेट पहिली होती. तसेच, सार्क संघटनेच्या गृहमंत्र्यांच्या बैठकीनिमित्त भारतीय गृहमंत्र्याने गेल्या पंचवीस वर्षात पाकिस्तानला दिलेली भेटही पहिली होय. येत्या १५ जुलै रोजी परराष्ट्र मंत्री एस.एम.कृष्णा इस्लामाबादला भेट देऊन पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री शहा महंमद कुरेशी यांच्याबरोबर चर्चा करणार आहेत. या घटनांकडे पाहिल्यास गेले काही महिने भारत व पाकिस्तान, अमेरिका व चीन या राष्ट्रांशी उच्च पातळीवरून सातत्यानं संवादप्रक्रिया सुरू असलेली दिसते. राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील लाओस व कंबोडिया या पूर्व आशियातील दोन देशांना लौकरच भेट देणार आहेत. त्यानंतर त्या दक्षिण आफिकेला भेट देणार आहेत. त्यांचे सचिव क्रिस्ती फर्नांडिस यांच्या मते, महात्मा गांधी यांचे दक्षिण आफ्रिकेतील प्रदीर्घ वास्तव्य व तेथे त्यांनी उभारलेल्या अहिंसात्मक आंदोलनाच्या प्रत्येक खुणा, स्मारकं पाहाण्याची श्रीमती पाटील यांना इच्छा आहे.

जून अखेरीस पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांनी टोरँटोला जाऊन जी-२० गटाच्या शिखर परिषदेत भाग घेतला. डॉ सिंग यांच्या भाषणाने भारताच्या प्रतिमेत भर घातली. या दौऱ्यात भारत व कॅनडा दरम्यान अणुऊर्जा क्षेत्रातील सहकार्याबाबत झालेल्या कराराने अणु उर्जानिर्मितीच्या दिशेने पुढचे पाऊल पडले. इंदिरा गांधी यांनी १९७४ मध्ये केलेल्या अण्वस्त्र चाचणीनंतर कॅनडाने अणुऊर्जा क्षेत्रात साह्य देण्याचे बंद केले होते. त्यानंतर तब्बल ३६ वर्षांनी झालेल्या कराराचे श्रेय भारत व अमेरिका दरम्यान झालेल्या १२३ या नागरी अणुऊर्जा समझोत्याला द्यावे लागेल. तत्पूर्वी तब्बल तीस वर्षे भारताबरोबर रशिया वगळता अन्य कोणतेही देश या क्षेत्रात सहकार्य करीत नव्हते. या समझोत्यानंतर रशिया, फ्रान्स, कझाकिस्तान, कॅनडा, अमेरिका आदी देशांबरोबर इंधन पुरवठा व सहकार्याबाबत झालेले करार ऊर्जापूर्तीच्या दिशेने आपल्याला लाभदायक ठरणार आहेत.

दरम्यान, माजी भारतीय लष्करी अधिकारी व निमलष्करी दलाच्या अधिकाऱ्याला कॅनडाचा व्हिसा नाकारल्यामुळे भारत व कॅनडाचे संबंध महिन्यापूर्वी अतिशय तणावग्रस्त झाले होते. दिल्लीतील दूतावासाच्या एका महिला अधिकाऱ्याने स्वतःच तसा निर्णय घेऊन ''या अधिकाऱ्यांचा मानवाधिकार उल्लंघनाशी संबंध असल्याचा 'जावई शोध लावला.' त्यामुळे परराष्ट्र मंत्रालयाने उच्चायुक्ताच्या ज्येष्ठ अधिकाऱ्याला बोलावून त्याची कान उघाडणी केली व कॅनडा सरकारकडे तीव्र निषेध नोंदविला. प्रत्येक देशातील सैन्य व अन्य निम-लष्करी संघटनांना सरकारचा आदेश व कायद्याच्या चौकटीत कर्तव्य बजवावे लागते व कोणतेही दुसरे राष्ट्र त्यास आक्षेप घेऊ शकत नाही. तसे केल्यास, सार्वभौमत्वालाच आव्हान दिल्यासारखे होईल, हे ठाऊक असूनही अधिकाऱ्याने आगाऊपणा केला. परंतु आपली चूक ध्यानात येऊन कॅनडा सरकारने जाहीर दिलगिरी व्यक्त केल्यावर ते प्रकरण संपुष्टात आले. चीननेही जम्मू काश्मीरमधील नागरिकांना एका वेगळ्या कागदावर व्हिसा देण्यास सुरूवात केली होती. त्याबाबतही भारताने जोरदार आक्षेप घेतला आहे.

तणावाच्या या पार्श्वभूमीवर डॉ.सिंग टोरँटोला गेले होते. निमित्त जी-२० गटाच्या बैठकीचे होते. तथापि, पंतप्रधान स्टीफन हार्पर यांच्याबरोबर झालेल्या वाटाघाटीत वातावरण निवळले व २९ जून रोजी अणुउर्जाक्षेत्रात सहकार्य करण्याचा करार झाला. कॅनडातर्फे भारताला अणुभट्ट्या देण्यात येणार आहेत. ''दुतर्फा व्यापाराचे प्रमाण केवळ ५ अब्ज डॉलर्स आहे, अशी खंत व्यक्त करून ते येत्या पाच वर्षात १५ अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्यात येईल,'' अशी घोषणा डॉ. सिंग यांनी केली. वाहतूक, पायाभूत रचना, कृषि, व प्रक्रिया अन्नोद्योग व उच्च शिक्षण या क्षेत्रात दुतर्फा सहकार्य वाढविण्याबाबतही सहमती झाली.

कॅनडात गेली अनेक वर्षे राहणाऱ्या तसेच तेथील नागरिकत्व घेतलेल्या सधन शिखांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. काही प्रमाणात त्यात आजही खलिस्तानवादी तत्व आहेत. अधुनमधून त्यांची भारत विरोधी निवेदनेही येत असतात. १९८५ मध्ये एअर इंडियाच्या कनिष्क विमानात दहशतवाद्यांनी केलेला बॉम्ब स्फोट व त्यात ठार झालेले प्रवासी यांची स्मृती २५ वर्षानंतर काहीशी पुसट झाली असली, तरी इंदिरा गांधी यांनी अमृसरच्या सुवर्णमंदिरात केलेल्या 'ब्लू स्टार ऑपरेशन' च्या जखमा कॅनडातील शिखांच्या मनात व दिल्लीतही कायम आहेत. परराष्ट्र सचिव श्रीमती निरूपमा राव म्हणाल्या,''

कॅनडियन नेत्यांनी व पंतप्रधानांनी मृत प्रवाशांच्या स्मारकाला भेट देऊन वाहिलेल्या श्रद्धांजलीने वातावरण सुधारले. शिख समुदायासाठी देशाने काय केले आहे, याचा डॉ सिंग यांनी खास उल्लेख केला. तसेच शिखांविरूद्ध झालेल्या हिंसाचाराबाबत आपण जाहीर माफी मागितल्याचेही सांगितले. त्यामुळे, कॅनडावासी शिखांना आपलेसे करण्याचा सिंग यांचा प्रयत्न काही प्रमाणात सफल झाला.''

जी-२० गटाच्या अनुषंगाने डॉ सिंग व अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्या चाळीस मिनिटे झालेल्या स्वतंत्र भेटीला सरकारी वर्तुळातून महत्व दिले जात आहे. अमेरिका व भारत यांच्या वाटाघाटीत प्रत्येक वेळी पाकिस्तानप्रणित दहशतवाद व २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या हल्ल्याचा मुद्दा उपस्थित केला जातो. न्यूयॉर्कमध्ये ११ सप्टेंबर २००१ साली 'वर्ल्ड ट्रेड टॉवर'वर झालेला हल्ला. त्यानंतर अमेरिकेने संबंधित अतिरेकी व त्यांचा मागोवा घेऊन केलेली धरपकड, ग्वांतानामो बे मधील तुरूंगात, अबुघरीबमध्ये त्यांचा झालेला अनन्वित छळ, त्यांना घडलेली अद्दल एकीकडे व भारतीय संसदेवर झालेला हल्ला व मुंबईवरील हल्ल्यानंतर दहशतवाद्यांना पाकिस्तानने आजवर दिलेले अभय, अतिरेकी अजमल कसाबवर चाललेला प्रदीर्घ खटला, त्यावर भारत सरकारने केलेला कोट्यावधी रूपयांचा खर्च, यांची तुलना करता येणार नाही. दोन्ही कडील कारवाईत जमीन-अस्मानाचं अंतर आहे. दहशतवाद्यांना जरब बसविण्याचा अमेरिकेचा निर्धार व ''त्यांच्यावर कारवाई करा'' अशी अजिजीची भाषा करणारा व ''पाकिस्तानने कृती करावी'' यासाठी अमेरिकेला विनंती करणारा भारत, याकडे पाहिले, की या हत्याकांडात ठार झालेल्यांना न्याय मिळणार, की नाही, अशी शंका उपस्थित होते. ''अल कैदाचा म्होरक्या हाफीज सईदच्या भारताविरूद्ध प्रक्षोभक भाषणांवर चाप लावा,'' पी.चिदंबरम इस्लामाबाद दौऱ्यात अंतर्गत खात्याचे मंत्री रहमान मलिक यांना सांगूनही काही उपयोग झाला नाही. उलट, ''पाकिस्तानात लोकशाही असून प्रत्येकाला वाणी स्वातंत्र्य असल्याने त्याच्या भाषणावर बंदी घालता येणार नाही,'' असे त्यांनी स्पष्ट केल्याने हाफीज सईदच्या भारतविरोधी कारवाया चालू राहाणार,हे निश्चित. 'पाकिस्तान अन् लोकशाही,' हा एक विनोद आहे. या तथाकथित लोकशाहीत खरी सत्ता लष्कर प्रमुख अश्फाक परवेझ कयानी यांच्या हाती आहे. मानवाधिकाराची पायमल्ली करण्यास ते एका पायावर उभे असतात, व जे मानवाधिकार पायदळी तुडवितात, अशा दहशतवाद्यांना खतपाणी घालतात.

दरम्यान दस्तावेजांचा (डोसियर्स) घोळ चालू आहेच. २५ जून रोजी झालेल्या चर्चेपूर्वी १८ जून रोजी हाफीज सईद व अन्य अतिरेक्यांबाबतचे पुराव्याचे दस्तावेज परराष्ट्र मंत्रालयातील संयुक्त सचिव यश सिन्हा यांनी भारतातील पाकिस्तानचे उपउच्चायुक्त रिफत मसूद यांना सादर केले. यातील गोम अशी, की जेव्हा जेव्हा दस्तावेज पाकिस्तानला दिले जातात, तेव्हा काही दिवसातच काहीतरी नवीन मुद्दा अथवा खुसपट काढून पाकिस्तानतर्फे अधिक माहीती मागितली जाते. ही तऱ्हा उरफाटी आहे. हल्ला पाकिस्तान प्रणित दहशतवाद्यांनी करायचा व त्याचे पुरावे देण्याचे काम आपण करायचे. ते देऊनही कारवाईबाबत पाकिस्तानने टोलवाटोलव करायची. हे गेले काही वर्ष चालले आहे. काबुलमधील भारतीय दूतावासावर गेल्या काही वर्षात तीन हल्ले झाले. त्यातही अल कैदाचा हात होता. तथापि, त्याविषयी आश्वासने देऊनही पंतप्रधान युसूफ रझा गिलानी यांनी काही कारवाई केली नाही. दुसरीकडे, करझाई सरकार कमकुवत आहे, म्हणून कारवाई करू शकत नाही. रहमान मलिक व पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री शहा महंमद कसुरी यांच्यातर्फे आता वेगळा राग आळवला जातोय. ''तालिबानला पाकिस्तानने रोखले आहे. अन्यथा तालिबानने केव्हाच भारत, बांगला देश आदीवर हल्ले चढविले असते.'' म्हणजे, पाकिस्तान बफर बनला असून, सारे हल्ले सहन करीत आहे. शेकडो लोक त्यात ठार होत आहेत, याची जाणीव भारताने ठेवली पाहिजे, असे त्यातून त्यांना ध्वनित करावयाचे आहे.

श्रीमती निरूपमा राव यांनी इस्लामाबाद भेटीपूर्वी सांगितले, की मुंबईवरील हल्ल्यासारखा एखादा जरी हल्ला झाला, तरी चर्चा प्रक्रियेला खीळ बसेल. कोणत्याही संभाव्य हल्ल्याला थोपविण्याची जबाबदारी पाकिस्तान घेण्यास तयार नाही. अशा बिकट स्थितीत चिदंबरम व श्रीमती राव यांच्या भेटीनंतर परराष्ट्र मंत्री कृष्णा इस्लामाबादला भेट देणार आहेत. ३० जून रोजी मी कृष्णा यांची भेट घेऊन इस्लामाबाद भेटीतून काय अपेक्षा आहे, असे विचारता ते म्हणाले, '' अविश्वासाची दरी आणखी कमी करण्याचे माझे प्रयत्न राहातील. आपल्यापुढे 'टॉक, टॉक अँड टॉक,' या व्यतिरिक्त आणखी कोणता पर्याय आहे?'' सर्वंकष वाटाघाटीसाठी भारत तयार नाही. कारण, दहशतवाद्यांविरूद्ध कोणतीही ठोस पावले पाकिस्तानने टाकल्याचे दृष्टीपथात नाही, की त्याचा ठोस पुरावा नाही. असे असूनही चर्चेची प्रक्रिया अथवा गुऱ्हाळ सुरू आहे. '''चर्चासूत्र' कायम आहे, हीच समाधानाची बाब असल्याचे

काही राजकीय निरिक्षकांचे मत आहे. सरकारी पातळीव्यतिरिक्त, पत्रकार, विचारवंत, महिलागट, न्यायमूर्ती, संसद सदस्य आदींच्या परस्पर गाठीभेटी सुरू आहेतच. परंतु, प्रक्रियेतून एखादा दहशतवादी घुसू नये, याचीही काळजी सरकार घेत आहे. याच उद्देशाने पाकिस्तानी व्यक्तीला भारताचा परवाना देण्याचे सारे अधिकार जून २०१० मध्ये केंद्रीय गृहमंत्रालयाने आपल्याकडे घेतले. त्यापूर्वी पाकिस्तानी नागरिकांना परवाना देण्याचे अधिकार इस्लामाबाद येथील भारतीय उच्चायुक्ताच्या कार्यालयाला होते. ''या बदलाने परराष्ट्र मंत्रालयाने आपले अधिकार गमावले, असे वाटत नाही काय,'' असे विचारता, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते विष्णु प्रकाश म्हणाले, की व्यक्तीच्या पूर्वपीठिकेबाबत छाननी करणारी गुप्तचर यंत्रणा गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली कार्य करते, त्यांच्याकडे गोपनीय माहिती, व ती गोळा करण्याची साधने असतात, त्यामुळे ही जबाबदारी मंत्रालयाने घेतली, यात वावगे नाही. उलट, आम्ही व्हिसा दिल्यावर ती व्यक्ती दहशवादी असल्याचे सिद्ध झाल्यास त्याची जबाबदारी दूतावास व मंत्रालयावर येईल. त्यातून परराष्ट्र मंत्रालय मुक्त झाले आहे.'' आजही प्राथमिक चौकशी दूतावासातर्फे केली जाते. त्यांचे अर्ज आता गृहमंत्रालयाकडे पाठविण्यात येतील. व मंत्रालयाने मंजुरी दिल्यावरच संबंधित व्यक्तीला व्हिसा देण्यात येईल. अशाच प्रकारचा बदल पाकिस्तानने केल्यास नागरी पातळीवर प्रवासावर अनेक बंधने येतील. परवाना प्रक्रियेला अक्षम्य विलंब लागण्याची शक्यताही उद्भवते. त्यातून नागरी पातळीवर दुतर्फा संवाद साधणार कसा? संबंध सामान्य करण्यास या प्रक्रियेचा अडसर होण्याची शक्यता अधिक. तथापि, देशाच्या सुरक्षेसाठी ते आवश्यक आहे, असे गृहमंत्रालयातर्फे सांगण्यात येते. मुंबईवरील हल्ल्यानंतर पुण्यातील जर्मन बेकरीवर झालेला हल्ला अलीकडील काळातील सर्वात मोठा होय. त्या प्रकरणातील चौकशीची सूत्रेही ढिसाळपणे हलत आहेत.

या परिस्थितीत दुतर्फा संबंधातील एक रूपेरी किनार, म्हणजे इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिलच्या अध्यक्षपदी निवड झाल्यावर १ जुलै रोजी कृषिमंत्री शरद पवार यांनी सिंगापूरहून केलेले वक्तव्य. ''दोन्ही देशांतील संबंध सुधारण्यासाठी पुन्हा भारत-पाकिस्तान क्रिकेट सामने सुरू करण्यावर आपला भर असेल,'' असे त्यांनी सांगितले. डेव्हिड मॉर्गन यांच्याकडून पवार यांच्याकडे सूत्रे आली. सारांश, लौकरच 'भारत-पाक दरम्यान 'क्रिकेट डिप्लोमसी'चा प्रारंभ होणार, असे मानावयास हरकत नाही. २०११ मध्ये भारत, श्रीलंका, बांगला देशातर्फे क्रिकेटच्या जागतिक चषकाचे आयोजन केले जाणार आहे, त्यावेळी पवार यांचे कुशल नेतृत्व क्रिकेटला लाभेल. १२ एप्रिल रोजी प्रख्यात भारतीय टेनिस पटू सानिया मिर्झा व पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू शोएब मलिक यांचा विवाह झाला. पाकिस्तान व भारत यात 'रोटीबेटी' व्यवहार झाला. या घटनेबाबत प्रारंभीचे वादग्रस्त वातावरण आता निवळले आहे. या घटनेचा संबंधांवर सकारात्मक परिणाम होईल.



*भोपाळमधील युनियन कार्बाईड कंपनी आणि तिचे तत्कालीन सीईओ वॉरेन अँडरसन.*

वॉरेन अँडरसन (युनियन कार्बाईड- विद्यमान डाऊ केमिकल्स) यांच्या परत पाठवणीच्या प्रकरणावरून विरोधक सत्तारूढ पक्षाला सभापटलावर कात्रीत पकडतील. याचे सर्व स्पष्टीकरण काँग्रेस पक्षाला करावे लागणार आहे. राजकीय परिभाषेत 'सेफ पॅसेज' हा शब्द आपल्याकडे अनेक वर्ष वापरात आहे. बोफोर्स प्रकरणातील इटालियन उद्योगपती ऑटॅव्हिओ क्वात्रोची यांनी काँग्रेस सरकारने देशातून पळून जाण्यास मदत केली, सेफ पॅसेज दिला होता. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या काळात इंडियन एअर लाईन्सच्या विमानाचे अपहरण झाले, तेव्हा प्रवाशांना सोडवून आणण्यासाठी परराष्ट्र मंत्री जसवंत सिंग यांनी अतिरेक्यांना खास विमानाने कंदाहारला नेऊन 'सेफ पॅसेज' दिला होता. शंकरराव चव्हाण गृहमंत्री असतानाही जम्मू काश्मीरमध्ये अतिरेक्यांना सेफ पॅसेज देण्यात आला होता. तसंच, हजारो लोकांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या अँडरसन यांना गृहबंदिस्त केले असूनही अमेरिकेत परतण्यास काँग्रेसच्या नेत्यांनी मदत केली. परंतु आता त्याबाबत 'नरो वा कुंजरो वा' चालले आहे. त्यावेळी मध्य प्रदेशात अर्जुन सिंग मुख्यमंत्री होते. ७९ वर्षीय अर्जुन सिंग काँग्रेसचे एकेकाळचे अल्पसंख्याकांचे मसिहा. काँग्रेसनं त्यांना कायमचं अडगळीत टाकलय. त्यांनी १९ जूनला भोपाळहून केलेल्या वक्तव्यात अँडरसन प्रकरणी हात झटकले. 'हिंदुस्तान टाईम्स' ला दिलेल्या मुलाखतीत अर्जुन सिंग म्हणाले, '' आय हॅव नो लोकस स्टँडाय ऑन धिस इश्यू .'' ते आता आपल्या आत्मचरित्रात त्याबाबत लिहिणार आहेत. तोपर्यंत देशाला प्रतिक्षा करणे आले! दरम्यान, हा निर्णय राजीव गांधी सरकारने घेतल्याची माहिती त्यावेळचे परराष्ट्र सचिव महाराज के रसगोत्रा यांनी दिली. त्यामुळे काँग्रेसचा जळफळाट झाला. रसगोत्रा हे शिष्टाईत निपुण असल्याने त्यांनी बोट दाखविले ते राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळातील परराष्ट्र मंत्री पी.व्ही.नरसिंह राव यांच्याकडे. ते तर केव्हाच स्वर्गवासी झाले. म्हणजे, अँडरसन यांच्या पलायनाला नेमकी मदत कोणी केली? आणि ती राव यांनी केली असेल, तर आता काय करायचे? त्यांना भारतात आणण्याचे प्रयत्न सुरू झालेत. डेव्हिड हॅडलेच्या जबानीसाठी भारताला जसे अमेरिकन सरकारच्या मेहेरबानीवर अवंलबून राहवे लागले, तसेच यासाठीही अवलंबून राहावे लागेल. सरकार किती गंभीर आहे, हे लौकरच समोर येईल. दरम्यान नियोजन मंडळाने वायूगळतीग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी ९८२ कोटी रू. चे साह्य मंजूर केले. त्यातील ४५ कोटी रू. येत्या पाच वर्षात या अपघातातून वाचलेल्यांच्या आरोग्यावर खर्च केले जाणार आहेत. गृहमंत्री चिदंबरम यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या मंत्रिमंडळाच्या गटाने मृताच्या निकटच्या नातेवाईकाला दहा लाख रू मोबदला देण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे फूल ना फुलाची पाकळी यावरच अपघातग्रस्तांना समाधान मानावे लागेल.

या प्रकरणाचा थेट परिणाम विज्ञान व तंत्रज्ञान खात्याचे मंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मांडलेल्या अणुदायित्व विधेयकावर होणार आहे. या विधेयकाला भाजप, डावे आघाडी पक्ष यांचा तीव्र विरोध आहे. विधेयकातील तरतुदींनुसार, अपघात झाल्यास अणुउर्जा प्रकल्प चालविणाऱ्या कंपनीला मोबदल्यासाठी जबाबदार धरले जाईल व ज्या परदेशी कंपन्यांनी यंत्रसामग्री, अणुभट्टी दिली असेल, त्यांच्यावर कोणतीही जबाबदारी नसेल. युनियन कार्बाइडच्या संदर्भात जनता व सरकारला मिळालेल्या फटक्यामुळे विरोधी पक्ष व जनता जागरूक व साशंक झाली आहे. त्यामुळेच हे विधेयक सम्मत होण्याचा मार्ग काटेरी असेल. सर्वसहमतीशिवाय सरकारने ते सम्मत केल्यास सत्तारूढ पक्षाच्या प्रतिमेवर विपरित परिणाम होईल.

सरकारने अलीकडे केलेल्या इंधन किमतीतील भरमसाठ वाढीचा फटका गरीब व समान्याला सर्वाधिक बसणार आहे. परिणामतः जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीचा खर्च वाढणार. तो माल ग्राहकाच्या हाती जाईपर्यंत त्यांच्या किमती वाढणार. रिक्षा, बस, टॅक्सी, विमानवाहतुकीची भाडेवाढ सातत्याने होत आहे. कॅनडाहून परत येताना डॉ सिंग यांनी, डिझेलच्या किमती बाजारभावाशी बांधून देण्याचा, सरकारी नियंत्रणातून त्या मुक्त करण्याचा इशारा दिला. एकंदरीत, अर्थव्यवस्थेचा वेग ८ टक्के असला, तरी त्याचा सर्वाधिक बोजा 'आम आदमी'ला सोसावा लागणार आहे. ''हे निर्णय अलोकप्रिय असले, तरी घेण्याची गरज होती,'' असे सरकारचे म्हणणे आहे. कारण खनिज तेलाचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यावरील आर्थिक बोजा हाताबाहेर गेला होता. ही भाववाढ करूनही कंपन्याचा तोटा पन्नास हजार रू. राहील. डॉ सिंग यांना अनुदानाचे युग अस्तेअस्ते संपुष्टात आणायचे आहे. परंतु जनप्रक्षोभाकडे, कृषिप्रधान व्यवस्थेकडे पाहाता, सरकारला ते येते काही वर्ष तरी शक्य होणार नाही, असेच दिसते.

■■■

## बोदवड परिसर सिंचन योजना शुभारंभ, जि. जळगाव

# पाण्याचा प्रत्येक थेंब उत्पादनवाढीसाठी वापरावा

**- राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील**



**जळगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील ४२ हजार हेक्टर जमिनीला पाणी देणाऱ्या व सुमारे २२०० कोटी रुपये खर्च येणाऱ्या बोदवड परिसर उपसा सिंचन योजनेच्या कामाचा शुभारंभ राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते नुकताच झाला. त्या समारंभाचा हा संक्षिप्त वृत्तांत व यावेळी झालेली मान्यवरांची भाषणे :-**

बोदवड परिसर सिंचनाच्या या योजनेच्या कार्यक्रमाला हजर राहताना मला विलक्षण आनंद होत आहे. हा कार्यक्रम माझ्या जन्मभूमीत आणि कर्मभूमीत होत आहे. माहेरी आल्यानंतर जो आनंद होतो तो अवर्णनिय असतो. तो आनंद अनुभवण्याचे भाग्य मला लाभले. सुरूवातीला जळगावनंतर मुक्ताईनगर मतदारसंघामधून जनतेचे प्रतिनिधीत्व केले. आमदार, उपमंत्री, मंत्री या नात्याने या भागातील जनतेची सेवा करण्याची मला संधी लाभली. अनेक कार्यकर्ते, नेते, वडीलधाऱ्या मंडळींचे आशिर्वाद मला लाभले. पित्याची, पतीची साथ मिळाली. पण सतत पाण्यासाठी तहानलेल्या या परिसराला हिरवेगार कसं करता येईल याची खंत माझ्या मनात योग आला आहे. पूर्णेवर धुपेश्वर, लाखमोली अशी तिर्थक्षेत्रे आहेत. अशा या पवित्र नद्यांचे पाणी आपल्या या भागात खेळेल आणि सतत दुष्काळी असणारा हा विभाग हिरवागार होईल. रखरखणाऱ्या या जमीनीची तृषा पाण्याच्या स्पर्शाने सुखावून आमच्या या परिसरात सुजलाम आणि सुफलाम दृश्य आम्हाला पाहायला मिळेल, याचा मला आनंद आहे. हजारो कोरडवाहू शेतकऱ्यांचे संसार फुलविणाऱ्या या भागाचा कायापालट करणाऱ्या या योजनेचा शुभारंभ होतोय आणि तो माझ्या हस्ते होण्याचा मला मान मिळतो आहे याचा वेगळा आनंद आहे. हा स्वप्नपूर्तीचा आनंद आहे.

बहिणाबाईंनी शेतकऱ्यांच्या कार्याचे महत्व अतिशय



***मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे राष्ट्रपती प्रतिभाताईंचे पुष्पहार घालून स्वागत करीत असून शेजारी एकनाथ खडसे, अजित पवार, शंकर नारायणन्, मनोहर नाईक आणि गुलाबराव देवकर.***

होती. ८० गावाच्या पिण्याच्या पाण्याची योजना झाली, पण जमीनीची पाण्याची तहान मात्र भागविता आली नव्हती. आज ती भागविली जाणार आहे, त्याचा शुभारंभ होत आहे, याचा मला मनस्वी आनंद होत आहे. मध्यप्रदेशातील मुलताईजवळ उगम पावणारी पापनाशिनी तापी मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवरून वाहते. अमरावतीच्या मेळघाट भागातून उतरून जळगाव जिल्ह्यात अवतरते. तसेच पूर्णामाय मध्यप्रदेशाच्या भैजनीजवळ उगम पावून अमरावती, अकोला, बुलढाणा जिल्ह्यातून वाहत येऊन जळगाव जिल्ह्यात तापीला मिळते. या दोन पवित्र नद्यांच्या संगमावर चांगदेव, मेहूण ही तिर्थक्षेत्रे महत्वाची आहेत. मला अनेकदा याठिकाणी जाण्याचा सुंदरपणे वर्णन केले आहे. त्यांनी म्हटले आहे की

विहिरीत दोन मोटा, दोन्हीमध्ये पाणी एक
मोट हाकेल तो एक, जीव पोसितो कितीक

अशा कित्येकांचे जीवनपोषण करणारी ही गंगा, जमुना – तापी, पूर्णा– आपल्यापर्यंत येत आहे, हे आनंदाचे आहे. पूर्वी विहिरीवर मोट असायची. पंप आले, पण त्यासाठी पाण्याची गरज होती. मोठ्या प्रमाणावर शेती ओलिताखाली आणण्यासाठी, लाखो लोकांना पोसण्यासाठी आणि ग्रामीण भागातील सुखसमृध्दी वाढविण्यासाठी जमीनीला पाणी देण्याची गरज असते. त्यामुळेच बोदवड परिसर सिंचन योजनेसारख्या भव्य योजना राबविणे ही काळाची गरज आहे. मुख्यमंत्र्यांनी

आणि अजितदादा पवार यांनी जे आश्वासन याच्या पूर्तीसाठी दिले ते फार मोलाचे आहे. दरवर्षी हतनूर धरणातून जवळजवळ दोनशे टीएमसी पाणी वाहून जाते. तापी खोऱ्यापासून हा भाग उंचावर असल्याने सिंचन करणे शक्य नव्हते. शेतीला लागणाऱ्या पाण्यासाठी हतनूर धरणाची उंची वाढविली असती तर अनेक एकर सुपिक जमीन त्याच्याखाली बुडाली असती. पाण्याचा मुख्य स्त्रोत्र नदीचाच असल्याने पुराचे पाणी साठवून आणि नंतर वापरणे हा त्याचा योग्य पर्याय होता. त्यानुसार पूर्णा, याच्यामध्ये या विभागाच्या आणि तापी महामंडळाचे अधिकारी यांनी खूप धावपळ केली आहे. शासनाचा पूर्ण पाठिंबा असल्यामुळे ही गोष्ट जलद गतीने करता आली. या सगळ्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करते.

शेती आणि शेतीची संबंधित क्षेत्र ही ग्रामीण भागाच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात फार मोठा वाटा उचलतात. गेल्या ६० वर्षांत आपल्या देशाने कृषीक्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी पार केली आहे. कृषी उत्पन्नाचे विक्रम केले. परंतु, तरीही



तापी या दोन्ही नद्यांचे ६० टीएमसी पाणी जून ते ऑक्टोबर दरम्यान जॅकवेलमधून मोठमोठ्या पंपांच्या द्वारे उचलून जामणी येथे ते साठवण केले जाईल. तेथून बंदिस्त पाईपने सुक्ष्म सिंचन पध्दतीने वितरित केले जाईल. त्यामुळे जळगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील १०१ गावांमध्ये ४२, ४२० हेक्टर जमीनीला फायदा होणार आहे. सुमारे २ हजार कोटींपेक्षा जास्त किंमतीची ही महत्वाकांक्षी योजना हाती घेतल्याबद्दल मी जलसंपदा विभाग, मुख्यमंत्री आणि महाराष्ट्र शासनाचे हार्दिक अभिनंदन करते. ही योजना लवकर पूर्ण व्हावी, त्यासाठी लागणाऱ्या ज्या तरतूदी असतात, जी कागदपत्रांची पूर्ती करावी लागते कोरडवाहू क्षेत्रातील उत्पन्न कसे वाढविता येईल याकडे मात्र विशेष लक्ष देण्याची गरज आहे. पारंपारिक पध्दतीने जी शेती केली जाते त्याच्यामध्ये आमुलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे.

मी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली आहे. ते यामध्ये लक्ष घालत आहेत. पिक उत्पादनामध्ये वाढ, विविधता , जलभूमी व्यवस्थापन, योग्य साठवण पध्दतींचा अवलंब, मालवाहतुकीच्या सोयी, शास्त्रीय ज्ञानावर कृषी पध्दतीचा वापर यावर भर देऊन उत्पन्नात वाढ करता येऊ शकेल. राष्ट्रीय अन्नसुरक्षा मोहिम आणि राष्ट्रीय कृषी विकास योजनांसारख्या दूरदर्शी योजनांमुळे



***मुख्यमंत्री अशोक चव्हाण आणि जलसंपदा मंत्री अजित पवार हे श्रीफळ, भेटवस्तू व मानचिन्ह देऊन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे स्वागत करताना.***

पिक विशेषानुसार कार्यनिती बनविली जाणे आवश्यक आहे. त्यामुळे आपल्याला दुष्काळात आपल्याला कमीत कमी तोटा येईल आणि अन्नसुरक्षा हे उद्दिष्ठ साधणे शक्य होईल आणि सिंचनासारख्या महत्वाच्या बाबीकडे लक्ष देता येईल. पावसावर आधारित शेती हा मोठा जुगार आहे. शेतकऱ्यांचे हाल होतात. पाऊस एकदा पडतो, पण बरेच दिवस पडत नाही. एकदा पेरावे, थोडेसे उगविते पण पाऊस पडला नाही तर सगळे वाया जाते. पुन्हा पेरणी करावी लागते. अनेक अडचणींना तोंड देत आमचा शेतकरीबंधु आजतागायत काम करीत आला आहे. त्यामुळे दीर्घकाळ पाण्याच्या उपलब्धतेसाठी योजना होणे आवश्यक होते, तिचा आज शुभारंभ होत आहे.

शेतजमीन आणि पाणी या दोन्ही गोष्टी शेतीसाठी अत्यंत मौल्यवान असून त्याचा योग्य पध्दतीने वापर करण्याची आवश्यकता आहे. कितीतरी जमीनीचा कस कमी होत आहे, त्यासाठी तांत्रिक तपासणीची आवश्यकता आहे. रासायनिक खतांचा अतिरेक आणि अयोग्य वापरामुळे जमीनीची गुणवत्ता बिघडत चालली आहे. यासाठी ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे. 'मोअर क्रॉप फॉर ड्रॉप'प्रत्येक थेंबातून जास्त उत्पन्न असा दृष्टिकोन बाळगून आपल्याला पावसाच्या पाण्याचे संचयन, जलाशयाचे पुनरुज्जीवन अशा सगळ्या गोष्टींना प्राधान्य द्यावे लागणार आहे. पाण्याचे स्त्रोत्र ही महाराष्ट्राची महत्वाची संपत्ती आहे. भारतातील अनेक नद्यांना भरपूर नैसर्गिक पावसाचा वरदहस्त लाभला आहे. परंतु, अलिकडे स्त्रोत्रांवर ताण पडताना आपल्याला दिसतो आहे. लोकसंख्या वाढत आहे, शहरीकरण होत आहे. औद्योगिकीकरणामुळे ते कमी पडायला लागले आहेत, असे दिसत आहे. त्यामुळे भविष्यात पाण्याचे संकट अधिक वाढणार आहे. यासाठी पाण्याचे सुयोग्य पध्दतीने व्यवस्थापन करावे लागणार आहे. ते करण्याची फार मोठ्या प्रमाणात गरज आहे.

आपल्या देशात पाणीवापराचे सामुहिक व्यवस्थापन कसे करता येईल यासाठी प्राचीन परंपराही आहे. सिंचनासाठी आणि जलसंवर्धनासाठी नवीन पध्दती अंमलात आणल्या जात आहेत. जुन्या पध्दती आणि आधुनिक विज्ञानाने उपलब्ध करून दिलेल्या नवीन तंत्रांचा वापर करून चांगल्या प्रकारे जलसंवर्धन करून पाण्याचा पुरेपुर वापर करू शकतो. पाणीव्यवस्थापन तंत्राचा प्रसार सर्वत्र होण्याची गरज आहे. जेणेकरून आपली शेती, आपला शेतकरी, शहरी आणि औद्योगिक उपभोक्ते उपलब्ध पाण्याचा कसा अधिक फायदा घेऊ शकतील, असा आपला प्रयत्न असायला हवा. 'थेंबे थेंब तळे साचे' असे आपण म्हणतो.ही म्हण प्रत्यक्षात आणण्यासाठी

व्यापक अशी जागृकता अभियान आपल्याला सुरू करावे लागते. त्यासाठी लोकसहभागाची आवश्यकता असल्याने ग्रामसभांच्या धर्तीवर शासकीय आणि सामाजिक पातळीवर याबाबत जनजागृती करून ठोस प्रयत्न करावे लागतील. शेततळी, सिमेंटबंधारे, गावतळी, पाझरतलाव, नालाबंडींग यासारख्या छोट्या छोट्या उपाययोजना मोठ्या प्रमाणावर राबविण्याची गरज आहे.

पाण्याची साठवणक्षमता वाढविणे, उपलब्ध जलाशयचा योग्य वापर करणे, गाळ काढण्यासारखी कामे हाती घेण्याची गरज आहे. सरकारी पातळीवर काम करण्याबरोबरच लोकांनीही प्रेरीत होऊन श्रमदानाद्वारे ही कामे केली जाऊ शकतात, हे दाखवून द्यायला हवे. ग्रामीण भागातील पार्श्वभूमी माहिती असलेल्या हुशार तरुणांना आपल्याला प्रशिक्षित करावे लागेल. लोकांना ते योग्य मार्गदर्शन करू शकतील, अशी व्यवस्था करावी लागेल. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांनीही जलाशय निर्मितीसाठी, त्याच्या देखभालीसाठी व्यवस्थापनासाठी पुढे आले पाहिजे. स्त्रियांनी या कार्यक्रमात फार मोठा सहभाग घेण्याची आवश्यकता आहे. शेती हा ग्रामीण क्षेत्रातील सर्वात महत्वपूर्ण व्यवसाय असून आपल्या राष्ट्रीय विकासामध्ये शेतीची महत्वाची भूमिका



*राज्यपाल शंकर नारायणन् यांचे स्वागत करताना अजित पवार.*

बजावते. परंतु, दारिद्र्यनिर्मूलनासाठी आणि ग्रामीण भागात समृध्दी आणण्यासाठी शेतीला अजुनही विकसित करण्याची गरज आहे. ती राष्ट्रीय गरज आहे. शहराकडे होणारे वाढते स्थलांतर रोखण्यासाठी आणि ग्रामीण पायाभूत सुविधा सुदृढ करण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. पाणी, वीज, रस्ते यासारख्या सोईंसाठी व्यापक प्रमाणावर ग्रामीण विकासाचे कार्यक्रम सुरू आहेत. ग्रामीण विकास मानवी विकासावर अवलंबून आहे, त्यामुळे लोकांच्या समीकरणावर सरकार भर देत आहे. सातत्यपूर्ण आणि सर्वांचा समावेश हा विकासाचा केंद्रबिंदू ठेवून काम करण्याची गरज आहे. त्याप्रमाणे काम होतही आहे.

कार्पोरेट क्षेत्रानेही कृषी क्षेत्राशी संबंध निर्माण करावा. ग्रामीण भागात अन्नप्रक्रिया आणि शेतमालावर आधारित उद्योगांच्या निर्मितीसाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील आणि बाजारपेठही उपलब्ध करावी लागेल. मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यप्रमाणे आपल्या भागात कापूस पिकतो. तेव्हा टेक्सटाईल्स पार्क करण्याची योजना त्यांनी मांडली आहे. आपण सगळ्यांनी त्याचे स्वागत केले पाहिजे.

कृषीक्षेत्रात संशोधनासाठी शेतकऱ्यांना खेळते भांडवल उपलब्ध करून द्यावे लागेल. ग्रामीण भागापुढील आव्हान असणाऱ्या प्रश्नांचा आज मी मुद्दाम उहापोह केला. मला असे वाटते, ग्रामीण भागातील बंधु-भगिनींना योग्य संधी आणि साधने उपलब्ध करून दिली तर ग्रामीण जनताही भारताच्या विकासात फार मोठी कामगिरी करू शकेल. बोदवड परिसर सिंचन योजनेमध्ये या अशाच संधीची उपलब्धता निर्माण होत आहे. मला माहित आहे की घराघरात या गोष्टीचा आनंद आहे. पाण्याची चातकाप्रमाणे वाट पाहणाऱ्या आमच्या या भागातील बंधु आणि भगिनींची अपेक्षा पूर्ण होणारा हा क्षण आज येथे आला आहे. या भागातील जनता या संधीचे सोने करेल अशी अपेक्षा बाळगते.

राष्ट्राच्या समृध्दीमध्ये भाग घेण्याची फार मोठी संधी उपलब्ध होणार आहे. या कामासाठी सर्व लोकप्रतिनिधी, महाराष्ट्र आणि केंद्र शासन या सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य केले याबाबत सर्वांचे अभिनंदन करायचे आहे . आज शुभारंभाचा आनंद आहे, पण ही योजना पूर्ण होईल, जमीन हिरवा शालू लेईल तेव्हा हा आनंद आणखी द्विगुणित होईल. पुढच्या येणाऱ्या सर्व पिढ्याचें जीवन आनंदात आणि सुखासमाधानात जावे अशी परमेश्वराकडे आपल्या वतीने प्रार्थना करते.

# मुख्यमंत्री अशोक चव्हाण :



बोदवड परिसर सिंचन योजनेचे स्वप्न आज पूर्ण होत आहे,यामागे आ. राष्ट्रपतींचे प्रयत्न आणि आशिर्वाद आहेत. या प्रकल्पासाठी त्यांनी खूप मदत केली. केंद्र सरकारकडून ज्या विविध परवानग्या लागतात, त्या मिळवून देण्यात त्यांचे सहकार्य लाभले. त्यामुळे बोदवड प्रकल्पाच्या कार्यारंभाचा सोनियाचा दिवस उजाडला आहे. मा. राष्ट्रपती या भागातील आहेत. आज त्या एका भागाच्या नेत्या नाहीत तर संपूर्ण देशाच्या नेत्या आहेत. संपूर्ण देश त्यांच्याकडे आशेने पाहतो आहे. पण, 'घार फिरते आकाशी, तिचे लक्ष पिल्लापाशी' या म्हणीप्रमाणे महाराष्ट्रातील प्रत्येक कामासाठी राष्ट्रपती मदत करतात. याठिकाणी काही गोष्टींचा खुलासा केला पाहिजे. खडसेंनी सांगितले की सेंट्रल वॉटर कमीनशनचा क्लिअरन्स यायचा आहे. मला सांगायला आनंद वाटतो की कालच त्याबाबतची परवानगी मिळाली आहे. हा प्रकल्प त्यांच्या कालमर्यादेत पूर्ण व्हावा ही सर्वांची अपेक्षा आहे. ती स्वाभाविकच आहे. या प्रकल्पातून मोठ्या प्रमाणावर सिंचनाची अपेक्षा आहे. हा सर्व परिसर हिरवागार होणार आहे. त्यासाठी वेळेत निधी देण्याची अपेक्षा आहे. केंद्र सरकारचे ९० टक्के आणि राज्य शासनाचे १० टक्के या प्रमाणात निधीसाठी आम्ही लवकरच प्रस्ताव दाखल करणार आहोत. परंतु, तो पैसा जोपर्यंत येत नाही तोपर्यंत काम अडणार नाही. राज्य शासन संपूर्ण पैसा या कामासाठी उपलब्ध करून देईल. याठिकाणी ज्या ज्या गोष्टी मी बोलतोय त्याची विचारणा खडसेजी मला सभागृहात करणार याची मला कल्पना आहे. परंतु, मी जे बोलत आहे ते काम झाले पाहिजे अशी सर्वांची इच्छा आहे. खान्देशच्या विकासाची आमची कमीटमेंट आहे. आम्हाला विदर्भाचा,मराठवाड्याचा अनुशेष दूर करता आला पाहिजेच परंतु एक जो भाग कायम दूर्लक्षित राहतो त्या खान्देशलाही झुकते माप देता आले पाहिजे. नाशिकला मंत्रीमंडळाची बैठक सहा महिन्यांपूर्वी झाली. त्यामध्ये खान्देशसाठी साडेसहा हजार कोटी रुपये देण्याचा निर्णय झाला. त्या सर्व पैशाचा चांगल्या पध्दतीने वापर व्हायला हवा. विकासाचा अनुशेष दूर करण्याची आमची तयारी आहे. वैधानिक विकास महामंडळाला आपण मुदतवाढ दिली. यासाठी राज्यपाल, केंद्रशासन आणि राष्ट्रपतींचे मी आभार मानतो. या निर्णयावर अंतिम सही मा. राष्ट्रपतींची झाली, त्यामुळे महाराष्ट्राच्या अविकसित भागाला पुरेसा निधी देता आला पाहिजे. उर्वरित महाराष्ट्रामध्ये खान्देशाचा समावेश असल्याने निधी मिळत नाही,असे वाटत असेल. परंतु, या निधीमध्ये खान्देशासाठी वेगळी उपसमिती करायची आहे. त्यामुळे खान्देशच्या विकासाचे नियोजन या उपसमितीच्या प्रस्तावानुसार केला जाईल. या परिसरात कापूस मोठ्या प्रमाणात पिकतो. त्यामुळे येथे टेक्सटाईल पार्क निर्माण करण्याबाबत मागणी आहे. त्याचा प्रस्ताव राज्यशासनाकडे आला तर त्याला त्वरीत मंजुरी देण्यात येईल. कपाशीवर आधारित प्रकल्प सुरू व्हायला हवेत. विदर्भ आणि खान्देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्यासारखे प्रश्न निर्माण होत आहेत. त्या कमी करण्यासाठी उद्योगाला चालना देण्यासाठीचे काही निर्णय आपण घेतले पाहिजेत. अमरावती-मुंबई रेल्वेलाईनवरील गाडी सात डब्यांची आहे, ती बारा डब्यांवर नेण्याची मागणी आहे. तो प्रश्न त्वरीत रेल्वेमंत्रालयाकडे नेऊन मंजूर करून घेऊ. या सगळ्या परिसराला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणायचे. सुवर्णमहोत्सवी वर्षात महाराष्ट्राच्या प्रगतीचा मार्गाचा फायदा सर्व अविकसित भागाला दिला पाहिजे. अखंड महाराष्ट्रामागे जी आपली भूमिका आहे, तो अखंड महाराष्ट्र ठेवण्यासाठी सर्वांना सहकार्याची शासनाची भूमिका आहे.

# विरोधी पक्षनेते एकनाथराव खडसे



तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून बोदवड प्रकल्पाचा कार्यारंभ होत आहे, हा सोनियाचा दिवस आहे. १९९७ मध्ये तापी महामंडळाची स्थापना झाली आणि १९९९ मध्ये या प्रकल्पाला मंजूरी मिळाली. सुरूवातीला बोदवड, जामनेर, मुक्ताईनगर परिसराचा यामध्ये समावेश होता. अनेक परवानग्या, पाण्याच्या उपलब्धतेचे अहवाल यानंतर या प्रकल्पाला मंजुरी मिळाली. जलसंपदा मंत्री अजित पवार यांनी त्यासाठी प्रयत्न केले. विदर्भातील निधीचा अनुशेष आणि जळगावमधील पाणी यांतून हा प्रकल्प साकार झाला आहे. शेवटी निधीच्या उपलब्धतेशिवाय काम होत नसते. बोदवड तालुका दुष्काळी आहे. बुलढाण्याचा दुष्काळी भाग याला जोडला गेला आहे. कायम दुष्काळी असलेल्या या भागाला पाणी मिळाले तर येथील नागरिक अधिक समृध्द होईल, विविध सहकारी संस्था उर्जितावस्थेत येतील, रोजगाराची निर्मिती होईल. त्यासाठी या प्रकल्पाचे महत्व मोठे आहे. अनेक वर्षे येथील जनता पाण्यासाठी आसुसलेली होती. आज राष्ट्रपतींच्या हस्ते उद्‌घाटन होत आहे, त्यामुळे या प्रकल्पाला गती मिळेल आणि लवकरात लवकर शेतात पाणी येईल. या प्रकल्पाच्या अडचणी सोडविण्यासाठी राष्ट्रपतींनी नेहमीच प्रयत्न केले. सीडब्ल्यूसी क्लिअन्सचा प्रश्न आला तेव्हा त्यांनीच पुढाकार घेतला. केंद्र सरकारच्या माध्यमातून पैसे मिळू शकतील. १५०० कोटी रुपयांचा प्रकल्प २२०० कोटी पर्यंत गेला. एवढा निधी उभारणे राज्य सरकारला शक्य नाही. यासाठी एआयबीपी योजनेत समावेश झाला तर केंद्राकडून निधी मिळू शकेल. यासाठी मा. राष्ट्रपतींनी प्रयत्न करावेत, अशी आमची विनंती आहे.



*अजित पवार हे एकनाथ खडसे यांचे पुष्पहार घालून स्वागत करताना शेजारी खासदार हरिभाऊ जावळे व इतर मान्यवर.*

# जलसंपदा मंत्री अजित पवार :

खान्देशातील बोदवड परिसर विकास योजनेच्या कार्यारंभाची सुरूवात आज खान्देशकन्या महामहिम राष्ट्रपतींच्या हस्ते होत आहे, हा या परिसरासाठी सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवा असा दिवस आहे. तसं पाहिलं तर याची सुरूवात खूप आधी करण्यात आली होती. परंतु, नंतरच्या काळात विदर्भ, मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी उर्वरित महाराष्ट्रात येत असलेल्या खान्देश आणि कोकण परिसरात जलसंपदा विभागाचा जो खर्च व्हायला पाहिजे तो दुर्दैवाने होऊ शकला नाही. परंतु, लोकशाही आघाडी सरकारने करण्यात आपण यशस्वी झालो. यापैकी ६४ दशलक्ष घनमीटर पाणी आपण जळगाव शहराला पाणीपुरवठ्यासाठी आरक्षित केले. नदीजोडसारखे प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. त्यासाठी मध्यप्रदेशच्या सरकारची मदत लागणार आहे. मी मुख्यमंत्र्यांना विनंती केली की आपण लवकरात लवकर मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली पाहिजे. तेथे भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. माझी विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांना विनंती आहे की आपणही त्यांच्या मुख्यमंत्र्यांना भेटायला आमच्यासोबत चला. पाण्याचा प्रश्न आपल्याला मार्गी लावण्यात येईल. बोदवड परिसर सिंचन योजना महामंडळाची महत्वाकांक्षी योजना आहे. तापी आणि पूर्णा नदीचे वाहून जाणारे पाणी पावसाळ्यात उचलून साठवायचे



*समारंभात जलसंपदामंत्री अजित पवार बोलत असून व्यासपीठावर राज्यपाल शंकर नारायणन, राष्ट्रपती प्रतिभाताई, अशोक चव्हाण, मनोहर नाईक, गुलाबराव देवकर व प्रताप जाधव.*

विदर्भ आणि मराठवाड्याचा अनुशेष बऱ्यापैकी भरून काढला आहे. त्यामुळे खान्देश आणि कोकण येथील विविध प्रकल्पांची कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न शासन करत आहे. तापी पाटबंधारे विकास महामंडळाने वर्षानुवर्षे रेंगाळलेल्या कामांना गती देण्यास सुरूवात केली आहे. १९७८ पासून रेंगाळलेल्या वाघुर प्रकल्पाला आपण गती दिली आणि तेथील दरवाजांची कामे पूर्ण केली. जवळपास २४८ दशलक्ष पाणीसाठा निर्माण आहे. या योजनेची अंदाजे किंमत २२०० कोटी आहे.या योजनेचा लाभ जळगाव जिल्ह्यातील बोदवड, मुक्ताईनगर आणि जामनेर आणि ६३ गावांतील २६, ७०० हेक्टर क्षेत्राला होणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मोतावळा, मलकापूर या तालुक्यांतील ३८ गावांतील १५ हजार ७०० हेक्टर क्षेत्राला होणार आहे. अशाप्रकारे दोन जिल्ह्यांतील मिळून दुष्काळग्रस्त १०१ गावांतील ४२४०० हेक्टर म्हणजे १



समारंभात व्यासपीठावर ना. मनोहर नाईक, ना. गुलाबराव देवकर आणि खा. प्रताप जाधव

लाख ६ हजार एकर जमीन ओलिताखाली आणण्याच्या महत्वाकांक्षी योजनेची सुरूवात राष्ट्रपतींच्या हस्ते होत आहे. पर्यावरणविषयक योजना मान्य झाली आहे. अडीच हजार हॉर्सपॉवरचे १७ पंप बसणार आहेत. सिंचन क्षेत्राच्या प्रमाणात आवश्यक निधी विदर्भ सिंचन महामंडळाकडून मिळणार आहे. केंद्र शासनाकडूनही जास्तीत जास्त निधी मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जळगाव आणि बुलढाणा जिल्ह्यांचे वर्षानुवर्षांचे पिढ्यानपिढ्या स्वप्न या निमित्ताने आपल्याला पूर्ण करायचे आहे. या भागात सिंचनक्रांतीचे एक नवीन पर्व सुरू करायचे आहे. पाठीमागील काळात या भागाचे स्वप्न स्वत: राष्ट्रपतींनी केले आहे. ज्या भागातील जनतेने आपल्यावर नेहमीच प्रेम केले. विधानसभा आणि मंत्रीमंडळात काम करण्याची संधी दिली त्यांच्यासाठी राष्ट्रपतींनी विशेष प्रयत्न करून हे काम पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला आहे.

## ‘बोले तैसा चाले’

विदर्भ आणि मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष पूर्णपणे भरून निघावा यासाठी आटोकाट प्रयत्न करून ‘बोलेन तसाच वागेन’ या उक्तीप्रमाणे कार्यरत राहिलेल्या जलसंपदामंत्री अजित पवार यांनी आता खानदेशचा अनुशेष भरून काढण्याचे मनावर घेतले असून त्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष पुरवून झपाट्याने कामे पूर्ण करण्याचे ठरविले आहे. बोदवड उपसा सिंचन योजना हा त्यातलाच एक भाग आहे. खानदेशातही अनेक उपसा जलसिंचन योजनांची कामे जलसंपदा विभागामार्फत हाती घेण्यात आली असून नद्यांवर बॅरेजसही उभारण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.





# वक्ता दशसहस्त्रेषु...!

- मुकुन्द मोघे

गेल्या आठवड्यात प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे झालेले देहावसान म्हणजे गेली तब्बल पाच दशके मराठी जनमानसावर अधिराज्य गाजविणाऱ्या एक तपस्वी ज्ञानयोग्याचा अस्त आहे! हा अस्त तसा अकाली म्हणता येणार नाही. कारण शिवाजीरावांनी वयाची ऐंशी केव्हाच पार केली होती, परंतु निसर्ग नियमानुसार वयोमानापरत्त्वे त्यांचे हे कायमचे जाणे प्रत्येक मराठी माणसाच्या डोळ्यांत पाणी उभे करून गेले, हे मात्र निश्चित. अहो, 'वक्ता दशस्त्रेषु' म्हणाव्या अशा या वाचस्पतीचे आपल्या सर्वांवरच फार मोठे असे ऋण आहे. सतत झंकारणाऱ्या वीणेप्रमाणे स्त्रवणारी त्यांची सरस-सुरस वाणी विविध क्षेत्रातील थोर विभूतींच्या चरित्र कथनाच्या निमित्ताने गेली ४०/५० वर्षे सातत्याने आपल्यावर शब्दफुलांचा वर्षाव करीत होती, 'श्रेयस' आणि 'प्रेयस' यातील फरक समजावून देत जीवनाकडे पाहाण्याची एक सम्य दृष्टी अगदी सहजी प्रदान करीत होती. त्यांच्या अमोघ आर्जवी वक्तृत्त्वानेच आपल्या या समाजाला ज्ञानोबा-तुकोबांपासून आचार्य विनोबांपर्यंत, समर्थ रामदासांपासून स्वामी विवेकानंद व योगी अरविंदांपर्यंत आणि महात्मा गांधींपासून महात्मा ज्योतिबा फुल्यापर्यंत अनेकानेक थोरा-मोठ्यांच्या असाधारण चरित्राची आणि चारित्र्याची नव्याने ओळख करून दिली गेली. विशेष म्हणजे ही ओळख करून देण्याचे 'असिधारा व्रत' शिवाजीरावांनी स्विकारले होते ते स्वतःच्या वक्तृत्वाचे चमत्कार दाखवून वैयक्तिक धन व किर्ती जोडण्यासाठी नाही तर अज्ञानाच्या, अहंकाराच्या व स्वार्थाच्या कर्दमात रुतलेल्या तुम्हा-आम्हाला त्यातून बाहेर काढण्यासाठी आणि तुमचे-आमचे वैचारिक उन्नथन घडविण्यासाठीच! स्वामी विवेकानंदांनी ज्या देशाचे वर्णन 'जगाचे देवघर' अशा शब्दात मोठ्या अभिमानाने केले. त्या देशातील सर्वसामान्य जनतेने पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करण्यात, त्यागाऐवजी भोगात रमण्यात आणि विवेक-वैराग्य व अभ्यासाची कांस धरण्याऐवजी अंगी फारसे गुण नसतानाही पोकळ मिजास मिरवण्यात आयुष्य वाया घालवावे, ही विदारक वस्तुस्थिती या 'हाडाच्या शिक्षका'ला साहवत नव्हती, पाहावत नव्हती आणि म्हणूनच सतत मुखरत राहून ते 'देशबंधूंनो, जागे व्हा, आपल्या आयुष्याला सद्धर्माची, सत्कार्याची, सद्बुद्धीची आणि सद्विचारांची जोड द्या'', असा संदेश अगदी कळकळीने देत होते. त्यांचा हा स्फूर्तीदायी संदेश अर्थातच त्या-त्या वेळी निश्चितच प्रभावी ठरला, अनेकांचे जीवन उजळवून गेला. कारण त्याला अगदी साध्या राहणीची व उत्तम आचरणाची जोड होती. लोकां सांगे ब्रह्मज्ञान-- हा प्रकार शिवाजीरावांच्या बाबतीत संभवतच नव्हता कारण या देशाचे, समाजाचे उन्नयन करण्यासाठी ज्यांनी आपली सारी शक्ती-बुद्धी वेचली अशा धर्मात्म्यांच्या-महात्म्यांच्या जीवनकथांचे अध्ययन, त्यांच्या

उदात्त विचारांचे मनन-स्मरण व उच्चारण आणि त्यानुसार यथाशक्ती आचरण हेच त्यांचे जीवनसूत्र होते. 'बोले तैसा चाले' या वचनाची प्रचिती अगदी दरक्षणी देणारा हा प्राध्यापक तसा व्यावहारिक अर्थाने अगदी तुमच्या-आमच्यासारखा सर्वसामान्य संसारी होता, हा संसार सांभाळताना त्याच्याही वाट्याला सारी सुखदुःखे व चढ-उतार आले होते परंतु मूळ प्रवृत्ती विरक्त संन्याशाची, साऱ्या विश्वाच्या कल्याणाची आस लागलेल्या ज्ञानयोग्याची असल्यामुळे की काय, आपल्या आयुष्याची सारी वाटचाल त्यांनी तशी 'इदं न मम्' अशा आत्यंतिक तटस्थ वृत्तीनेच केली. आपल्या अपूर्व वक्तृत्त्वगुणाच्या बळावर स्थानिकच नव्हे तर अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय व्यासपीठेही अगदी सहजी गाजविणारा, जिंकणारा हा माणूस खासगी जीवनात मात्र अतिशय अबोल होता, असे सांगितले तर त्यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. परंतु शिवाजीरावांच्या निकट सान्निध्यात जाण्याचे दुर्मिळ भाग्ययोग माझ्यासह ज्या इतर अनेकांना लाभले, त्या सर्वांचा हाच अनुभव होता, हे मात्र निश्चित. सुमारे २५ वर्षांपूर्वी मी काही काळ सातारला जिल्हा माहिती अधिकारी होतो आणि त्यामुळे शिवाजीरावांचे प्रिय 'फलटण' माझ्या कार्यक्षेत्रात होते. सरकारी कामे व काही सभा-समारंभांच्या निमित्ताने नगरमधील 'अरविंद धामा'त शिवाजीरावांच्या दर्शनास जात असे. दर्शन हा शब्द मी येथे अगदी जाणीवपूर्वक वापरत आहे. कारण अनेक अर्थांनी ते माझे दैवत होते. त्यांच्यापुढे काही वेळा बसावे, आपणच काही तरी बोलावे आणि प्रतिसादादाखल मंद स्मितासह कानावर पडलेल्या चार मार्गदर्शनपर, प्रोत्साहिक शब्दांचा प्रसाद घेऊन 'पुन्हा भेटू या' म्हणत बाहेर पडावे हाच माझा दरवेळचा अनुभव होता.

पुढे पत्रकार म्हणून पुण्यात 'सकाळ'मध्ये रुजू झाल्यावर मला सातारचे प्रसिद्ध चरित्रकार भालचंद्र विष्णु धर्माधिकारी यांच्या गौरवग्रंथाचे संपादन करण्याचा योग आला. या पुस्तकाचे प्रकाशन मराठा चेंबरच्या सभागृहात करताना शिवाजीरावांनी माझ्या लेखनगुणांची प्रशंसा केली आणि 'चांगुलपणाचे वेड असलेले चांगले पत्रकार आहात, यापुढेही तसेच राहा', असा मार्मिक सल्लाही दिला. त्यांचा तो उपदेश हीच माझी आजवरची सर्वात मोठी कमाई आहे, असे मी मानतो आणि शिवाजीरावांच्या सहवासाचा लाभ झालेल्या प्रत्येक व्यक्तीची अगदी हीच भावना असेल, अशी मला खात्री आहे.

आज शिवाजीराव काळाच्या पडद्याआड गेले आहेत, परंतु मधुर वैखरीचा वर्षाव करणाऱ्या, सदैव जगाच्या कल्याणाची चिंता बाळगणाऱ्या आणि समोर आलेल्या प्रत्येकाला देव, देश अन् धर्मासाठी जगण्याची प्रेरणा देणाऱ्या त्यांच्या सिध्यासाध्या पण प्रसन्न, हसतमुख व्यक्तीमत्त्वाची जी नाममुद्रा समस्त सुजनमानसावर कोरली गेली आहे ती मात्र अवीटच राहील, हे निश्चित!

■■■



## 'त्या सुवर्णयुगा'चा शेवटचा शिलेदार!

महाराष्ट्राच्या या भूमीने आजवर उत्तम वक्तृत्त्वाचे अनेक चमत्कार अनुभवले आहेत. अर्थात टीव्ही, कॉम्प्युटर व इंटरनेटच्या जाळ्यात अडकलेल्या आणि सात्त्विक प्रबोधनापेक्षा चिल्लर मनोरंजनातच अधिक रस असलेल्या नव्या पिढीला असे वक्ते, अशा सभा म्हणजे काय याची कल्पनाही करता येणार नाही. परंतु तिचे सुदैव असे की उत्तमोत्तम व्याख्यांचे ते सुवर्णयुग अस्तास जात असताना तिला त्या युगाचे शेवटचे शिलेदार म्हणावे अशा शिवाजीरावांच्या असाधारण वक्तृत्त्वाचा लाभ घेण्याची संधी मात्र अनेक छोट्या-मोठ्या निमित्तांनी मिळत गेली आणि आपल्या अवती-भवतीच्या जगात काही उत्तम-उदात्त-उन्नत म्हणावे असे निश्चितच काही तरी आहे याचीही चांगली जाणीव झाली. या जाणीवेचे महत्त्व वर-वर पाहाता तसे कदाचित कोणाला जाणवणारही नाही, परंतु 'ही जाणीवच कोणत्याही व्यक्तीच्या, समाजाच्या व देशाच्या यश-किर्तीचा पाया असते,'' असे खुद्द शिवाजीरावाच सांगून गेले आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस पश्चिम महाराष्ट्र विभागीय बैठक, कासेगाव



# कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन कामे करा

**- अजित पवार, जलसंपदा व ऊर्जा मंत्री**

> आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीची तयारी करण्याच्या निमित्ताने २५ जून रोजी सांगली जिल्ह्यातील कासेगाव येथे कै. राजाराम बापू पाटील यांचे स्मारक असलेल्या 'पदयात्री' या वास्तूत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पश्चिम महाराष्ट्र विभागीय बैठक संपन्न झाली. तिचा हा संक्षिप्त वृत्तांत :

पश्चिम महाराष्ट्र हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून सुरुवातीपासूनच ओळखला जातो. या परिसरात आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व विधानसभा-लोकसभा निवडणुकांच्या तयारीच्या दृष्टीने बैठक होत आहे. या बैठकीची अतिशय उत्तम व्यवस्था केल्याबद्दल जयंतराव पाटील, विलासराव शिंदे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना मी सुरुवातीला मनापासून धन्यवाद देतो. या बैठकीसाठी आलेल्या कार्यकर्त्यांना माझे आवर्जून सांगणे आहे की, जयंतरावांनी साखर कारखाना, दूधसंघ, सूतगिरणी, बँक, शिक्षणसंस्था, उच्च व तंत्रशिक्षणांची महाविद्यालये, पदयात्री व ज्या अनेक संस्था अत्यंत ताकदीने उभ्या करून उत्कृष्ट व्यावसायिक पद्धतीने चालविल्या आहेत. त्या सर्व संस्था कार्यकर्त्यांनी जाऊन बघितल्या पाहिजेत. येथे जे चांगले काम झाले आहे ते सगळेच्या-सगळे आपल्याला जसेच्या तसे कदाचित मतदारसंघात उभे करता येणार नाही. पण त्यातल्या काही भाग व एखादी संस्था जरी उभी करता आली तर खूप काम होऊन जनतेच्या पदरात काही पडू शकेल. शेवटी जनतेला काय पाहिजे हेच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी लक्षात घेऊन त्याच पद्धतीने काम करीत गेले तर राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करतो आहे हा विश्वास जनतेमध्ये वाढीला लागल्याशिवाय राहणार नाही.

जून महिन्यात आपण एकत्र जमलो आहोत. सुरुवातीला पहिल्यांदाच जूनमध्ये राज्यात सर्वत्र व्यवस्थित पाऊस पडला आहे. कोयनेत फक्त ३-४ टीएमसी पाणी आलेले आहेत. बाकी धरणात मात्र अजून फारसे पाणी वाढलेले नसले तरी पाऊस सर्वत्र चांगला झालेला आहे. पवारसाहेब सातत्याने आम्हा सर्वांशी बोलून खते, औषधे, बी-बियाणे व्यवस्थित मिळतायेत की नाही याबाबतची चौकशी करीत आहेत. पवारसाहेबांची सध्या काही कारणांमुळे लोकांशी सातत्याने भेट होत नसली तरी शेतकऱ्यांच्या गरजा वाफसा पूर्ण होण्याच्या अगोदर पूर्ण केल्या पाहिजेत. यासाठी पर्यंत करा, असे त्यांचे आम्हाला सांगणे आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना जिथे कुठे अडचण मला जे वाटते तसे होऊ शकत नाही. आता आपली ताकद राज्यात वाढत चाललेली आहे. यावेळेला ६२ जागा मिळाल्या असल्या तरी अपक्षांचा पाठिंबा घेऊन आपली ती संख्या जवळपास ८२ वर जात होती. काँग्रेस ९०-९२ पर्यंत पोहोचत होती. कोल्हापूरात काँग्रेसच्या पालकमंत्र्यांकडून राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना खूप त्रास होतो आहे याबद्दल आमदार के. पी. पाटील आत्ताच भाषणात बोलले. पालकमंत्री कशा पद्धतीने राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना त्रास देतात याची अनेक उदाहरणे के. पी. पाटील यांनी सांगितली. ती सर्व मी शांतपणाने ऐकली आहे. पुढच्या आठवड्यात मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्याबरोबर कामकाज करताना येणाऱ्या निरनिराळ्या



*बैठकीचे दीपप्रज्वलनाने अजित पवार उद्‌घाटन करीत असून शेजारी मधुकरराव पिचड, वसंत वाणी, जयंत पाटील, लक्ष्मणराव ढोबळे, रमेश शेंडगे, आण्णा डांगे, विलासराव शिंदे व इतर मान्यवर.*

असेल तिथे त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा.

एका वेगळ्या परिस्थितीत स्वाभिमानातून पक्षाची आपण स्थापना केली, तेव्हा सुरुवातीच्या निवडणुकांमध्ये विधानसभेत ७५ जागा काँग्रेसला आणि ५८ जागा आपल्याला मिळाल्या. समविचारी पक्ष म्हणून आपण त्यांच्याबरोबर सत्तेत आघाडी केली. आघाडी सरकारमध्ये प्रत्येक गोष्ट आपल्या मनाप्रमाणेच होईल, असा आग्रह धरता येत नाही. तुम्हाला अडचणींची चर्चा करण्यासाठी बैठक होणार आहे. त्या बैठकीत हा विषय उपस्थित केला जाईल.

विशेष कार्यकारी दंडाधिकारी, जिल्हा तालुका समित्या, संजय गांधी समिती व इतर कमिट्यांची चर्चा करून पदाधिकारी लवकर नेमून कार्यकर्त्यांना न्याय देण्याची भूमिका निश्चितपणाने घेतली जाईल. १० वीच्या मुलांना न्याय देता यावा म्हणून बेस्ट फाईव्हचा निर्णय आम्ही घेतला होता. परंतु उच्च न्यायालयाने




*बैठकीत अजित पवार बोलत असून व्यासपीठावर जयंत पाटील, पृथ्वीराज देशमुख, रविंद्र माळवदकर, निवेदिता माने, आण्णा डांगे व इतर मान्यवर.*

तो रद्द ठरविला. एस.एस.सीच्या मुलांवर अन्याय होतो म्हणून हा निर्णय जाणीवपूर्वक शासनाने घेतला होता, परंतु उच्च न्यायालयात बाजू मांडायला आपण कमी पडलो. त्यामुळे आज थोडी संभ्रमावस्था बघायला मिळते आहे. परंतु विद्यार्थी व पालकांनी त्याबाबत काळजी करू नये. ॲडव्होकेट जनरल यांना बोलावून त्यांच्याशीही याबाबत चर्चा करण्यात आलेली आहे. आपल्या विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही आणि न्यायालयाचाही अवमान होणार नाही याची काळजी घेऊन राज्यसरकार योग्य तो निर्णय करेल. मात्र, गेल्या दोन-तीन वर्षांपासून विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यात अनंत अडचणी येतायेत. प्रवेश सोपा होत नाही. शिक्षणमंत्रीपदाचा तात्पुरता कार्यभार मंत्र्यांकडे दिलेला आहे. त्याऐवजी पूर्णवेळ स्वतंत्र कार्यभार दिला पाहिजे, अशी भूमिका आम्ही मुख्यमंत्र्याकडे मांडलेली आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चांगली जाणीव पवारसाहेबांना असल्यामुळे त्यांनीही अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. स्पष्टपणाने भूमिका मांडल्या आहेत. शून्य टक्के व्याजाने २५ हजारापर्यंत कर्ज दिले जाणार आहे. राज्य सरकारनेदेखील ५० हजारापर्यंत शून्य टक्के दराने आणि ५१ हजार ते ३ लाखांपर्यंत ३ टक्के दराने कर्ज देण्याचा निर्णय घेतलेला आहे. जिल्हा सहकारी बँक आर्थिकदृष्ट्या अडचणीत असेल तर शेतकरी राष्ट्रीयकृत बँकेतूनही कर्ज घेऊ शकतो. ऊस, कापूस यासाठी चांगले दर व पॅकेजेस देताना साहेबांना सुरुवातीला वाईटपणा घ्यावा लागला, त्याबद्दल काहींनी नाराजीही व्यक्त केली. पण बळीराजाला मदत झाली पाहिजे, अशी भूमिका घेऊन आम्ही सर्वजण खंबीरपणाने उभे राहिलो त्यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात निश्चित मदत होऊ शकली आहे. माझं तर कार्यकर्त्यांना सांगणं आहे की, ५१ हजार ते ३ लाखांपर्यंतच कर्ज दोन टक्के व्याजदरानं घ्या आणि चांगल्या पतसंस्थेत १० टक्के दरानं ठेव म्हणून ठेवा. मोठमोठे उद्योगपतीदेखील असंच करतात.

मघाशी रवींद्र माळवदकर म्हणाले की, रिक्षातून फक्त पाचच विद्यार्थी वाहून न्यायला का परवानगी देता? काही रिक्षावाले एकेका रिक्षात १५-२० विद्यार्थी कोंबतात. मेंढरं कोंबवावी अशी पोरं कोंबतात. काही अपघात झाला तर नुकसान मुलांचं आणि पालकांचं. बसेसचे टॅक्सेस आम्ही खूप कमी केले आहेत. प्रत्येक सीटमागे वर्षाला १५०० रुपये टॅक्स होता तो १०० रुपयांवर आणला आहे. तीन चाकी रिक्षांवर बंधन आणली आहेत. चार चाकींवर बंधने नाहीत. मात्र, त्यांनी पिवळा रंग लावला पाहिजे. ग्लोबल वार्मिंगचे संकट

खूप मोठे आहे. त्याचा सामना करण्यासाठी प्रत्येक संस्थेनं पुढाकार घेण्याची गरज आहे. त्या दृष्टीने पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने एक कोटी रोपे तयार करून ती या पावसाळ्यात लावली जाणार आहेत. वनीकरणाच्या कामात अशाच पद्धतीने कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सातारा या जिल्हापरिषदांनी पुढाकार घ्यावा.

सांगलीचे जिल्हापरिषद अध्यक्ष तर आज मंत्री जयंत पाटील यांच्याच विरुद्ध बोलले. पत्रकारांना मुलाखती दिल्या. थेट पेपरमध्ये विधान करणे आणि पत्रकारांना जाऊन सांगणे हे राष्ट्रवादीच्या कुठल्याही पदाधिकाऱ्याने करता कामा नये. जिल्हाध्यक्ष विलासराव शिंदे यांच्यामार्फत संबंधित जिल्हा परिषद अध्यक्षांना जाब विचारून त्याचा खुलासा मागविला पाहिजे. चूक झाली असेल तर त्याला पायउतार व्हायला सांगितले पाहिजे. संघटनेला सर्व माणसे सारखी असतात. १२ व्या वित्त आयोगाचा पैसा तसेच केंद्राचा कोट्यावधींचा अनेक योजनांचा निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिला आहे. त्यांनी तो खऱ्या गरजू लोकांकरिता व चांगल्या विकास कामांकरिता वापरला पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांनी गेल्या दहा वर्षांत चांगल्यातल्या चांगल्या योजना ग्रामीण महाराष्ट्राला व शहरांना देऊ केल्या आहेत. केंद्र सरकारने सहा ते चौदा वयोगटातील विद्यार्थ्यांना सक्तीने शिक्षणाचा अधिकार दिला आहे. त्यापासून कोणीही वंचित राहता कामा नये. अशा पद्धतीने कार्यक्रम राबवा. मात्र, ते करीत असताना शिक्षणाचा दर्जा चांगला राहिल याचीही काळजी घ्या.

१०० टक्के अधिकारी तुम्ही म्हणेल तसे वागणार नाही. आपण अधिकाऱ्यांकडून काम करून घ्यायचे असते. वेडीवाकडे कामे सांगू नका. सरळ, लोकांची उपयुक्त व समाजाच्या हिताची कामे हवीत. वैयक्तिक कुणाच्याही स्वार्थाची कामे नसावीत. अशा पद्धतीने कामे करीत गेलो तर अधिकारी निश्चित चांगला प्रतिसाद देतात.

यंदाच्या वर्षी ऊस प्रचंड आहे. आमच्या परिसरात या वर्षी ४०० ते ४५० हेक्टर ऊस गळिताविना राहिला. त्याला आपण आता नुकसानभरपाई देतोय. परंतु पुढच्या वर्षीचे नियोजन आत्तापासूनच केले नाही अनंत अडचणी येतील. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली असून १ ऑक्टोबरपासून कारखान्यांचा गळित हंगाम सुरू करायचा आणि एफआरपीप्रमाणे पहिला हप्ता द्यायचा असा निर्णय झाला आहे. ज्यांचा जास्तीचा दर निघेल त्याने दुसरा हप्ता द्यावा. वेळ पडली तर ऊसतोडणीसाठी मशिनरीचा कसा वापर करता येईल, याचा सल्ला वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमार्फत घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

कोजनरेशनसाठी जास्तीत जास्त झुकते माप देण्यात येऊन प्रती युनिट विजेकरिता ४ रु. ८९ पैसे एवढा दर दिला आहे. बँकादेखील या कोजनरेशनच्या प्रकल्पाला कर्जपुरवठा



*'पदयात्री' स्मारकामध्ये उभारण्यात आलेल्या कै. राजारामबापूंच्या पुतळ्याजवळ उभे राहून परिसराची पाहणी करताना अजित पवार, जयंत पाटील, मानसिंगराव नाईक, विलासराव शिंदे व इतर मान्यवर.*



*स्मारकामधील कै. राजारामबापूंची छायाचित्रे पाहण्यात दंग झालेले अजित पवार आणि जयंत पाटील व इतर मान्यवर.*

करायला तयार आहेत. भारनियमनाचे संकट कमी करण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त वीज कशी निर्माण होईल, याकडे लक्ष देत आहोत. विंडमिललाही प्राधान्य देऊन तीही वीज वाढविण्याचा प्रयत्न करतो आहोत. विजेसाठी कुणाला आंदोलन करावे लागू नये अशी राज्यसरकारशी भूमिका आहे. सौरउर्जेपासून विज प्राधान्य देण्यात आले असून, ही वीज १७ रुपये ८५ पैसे युनिट या दराने आपण खरेदी करणार आहोत. यासाठी केंद्र सरकारकडून प्रती युनिट १५ ते १६ रुपये सबसिडी मिळणार असून ही वीजनिर्मिती अत्यंत फायदेशीर आहे. सातारा जिल्ह्यात सौरउर्जेचे एक युनिट टाकण्यात आले असून, त्याला एक मेगॅवॅट वीज तयार करण्याची ऑर्डर आम्ही दिली आहे. अपारंपारिक उर्जेचा जास्तीत जास्त वापर करून ग्लोबल वॉर्मिंगच्या संकटावर मात करायची असा आमचा प्रयत्न चालू आहे. त्या दृष्टीने सातत्याने लोकांना शिक्षण देण्याचाही प्रयत्न आम्ही करतो आहोत. आम्ही राज्यसरकारच्या वतीने जे धोरण आणतोय त्यातून ५०० मेगॅवॅट वीज सौरउर्जेपासून मिळाली पाहिजे असे धोरण आखतो आहे. कै. राजाराम बापू पाटील यांचे स्मारक असलेल्या या 'पदयात्री'च्या रूफवर आपण सोलर पॅनेल बसवू शकतो. त्यातून या संपूर्ण इमारतीची उर्जेची गरज भागवू शकेल. सौरऊर्जा ही काळाजी गरज आहे. त्याकरिता आपण काम करतोय. पाण्याचे यंदाचे नियोजन नीटपणाने करण्याचा प्रयत्न केला जाईल.

हवामान खात्याचा अंदाज यंदा सरासरी इतका पाऊस येईल इतका असून जून महिन्यात झालेल्या पावसामुळे उसाचे टनेज वाढेल तसेच इतर पिकांनाही फायदा होईल. महिला बचत गटांची चळवळ वाढविण्याच्या दृष्टीने सुप्रिया सुळे जोमाने काम करीत असून, यंदा भीमथडी जत्रा दिवाळीच्या अगोदर भरविण्यात येईल, त्यामुळे पुणे विभागातील महिला बचत गटांना अधिक उत्पन्न मिळू शकेल. सातारा आणि पुणे जिल्ह्यातील महिला बचत गटांना शून्य टक्के दराने जिल्हा बँका कर्ज देत असून, इतर बँकांनीही त्यासाठी पुढे आले पाहिजे. राज्यातील युवकांच्या विकासाचे धोरण ठरविण्याकरिता नुकतीच एक बैठक झाली असून, निवडक युवकांचे शिबीर बारामती येथे ठेवण्यात आले आहे. लोक नाविन्यांच्या शोधात असतात. नवीन युवकांना जास्तीची संधी दिली पाहिजे. जुन्यांचे काही चुकले तर लोक त्यांना बदलायला मागे-पुढे पाहत नाही. तेव्हा जुन्या लोकांनीही लोक आमच्या मागे आहेतच या विचारात राहू नये. लोकांना व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊनच

या पुढील काळात काम करावे लागेल. नुसत्या सहकारी संस्था आपल्या ताब्यात घेऊन उपयोग नाही. त्या नीटपणे चालवाव्या लागतील. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात संस्था गेली तर तो कार्यकर्ता अतिशय उत्तमपणे संस्था चालवितो, असा विश्वास आपल्याला निर्माण करायचा आहे. यासाठी वेळ पडली तर पक्षसंघटनेने हस्तक्षेप करून त्या कार्यकर्त्याला नीट वागायला भाग पाडले पाहिजे. युवक व विद्यार्थ्यांकरिता चांगला कार्यक्रम देण्याचा आपण प्रयत्न करतो आहोत.

राज्य शासनामार्फत महामंडळाला जास्तीचे भागभांडवल उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आम्ही लवकरच मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार आहोत. त्यांनी रक्कम वाढवून दिल्यानंतर आपल्या पदाधिकाऱ्यांनी मुठभर लोकांनाच पाच-दहा लाखांचे कर्ज महामंडळातून द्यायचे ही यापुढे चालणार नाही. अधिकाधिक गोरगरिबांना हा पैसा उपलब्ध झाला पाहिजे. यासाठी महाराष्ट्र सरकारला व अर्थमंत्री सुनील तटकरे यांना आम्ही निधी द्यायला सांगू.

निवडणुकीत तिकिटांचे वाटप करताना निवडून येण्याची पात्रता ही खूप मोठी असते. काही ठिकाणी कुणबी हे ओबीसीमध्ये मोडतात. किमान तिथल्या जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती यांच्यामध्ये सहा महिने आधी कुठले आरक्षण निघाले आहे हे लोकांना कळावे. यातून लोकांना त्या आरक्षणाचा लाभ घेता येईल अशा दृष्टीने जागृती वाढविली पाहिजे. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, जिल्हा तालुका कमिट्या आज अनेक ठिकाणी झालेल्या नाहीत. कोल्हापूरमध्ये त्या होत नाहीत तोवर इंदापूरच्याही मी होऊ देणार नाही. कारण पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री मीच आहे. समन्वयकाने काम चांगले केले तर लोक सन्मान देतात. काम न करता पदाधिकाऱ्यांनी सन्मानाच्या अपेक्षा ठेऊ नयेत. कोल्हापूर हा छत्रपती शाहू महाराजांचा कार्यकर्तृत्वाचा परिसर. तिथे कसली विचित्र पॅनेल उभी राहतात. तिथे पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढविण्याची इच्छा अध्यक्ष आणि आमदारांनी आता व्यक्त केली. वास्तविक, तुम्ही कोल्हापूरच्या जनतेला विश्वासात घेऊन सांगितले पाहिजे की, राष्ट्रवादीच्या हाती कोल्हापूर महापालिकेची सत्ता दिली तर रस्ते, पिण्याचे पाणी, सांडपाण्याचा निचरा याची चांगली व्यवस्था करू. हा विश्वास जोपर्यंत आपण तेथील रहिवाशांना देऊ शकत नाही, तोवर सत्ता आपल्याला मिळणार नाही. सांगली मिरज-कूपवाड महापालिकेत जयंत पाटील यांनी दाखवून दिले की, कुठे,



कुणाची कायमची मक्तेदारी नसते. पण काम करण्याच्या दृष्टीने कुणीतरी मनावर घेतले पाहिजे आणि त्याला कुणीतरी पाठिंबा दिला पाहिजे.

आज लोक खूप बदलले आहेत. त्यांना रिझल्ट हवे आहेत. बोलघेवडे आणि खोटी आश्वासने देणारे नेते त्यांना नको आहोत. एकतर काम होईल म्हणून सांगा नसेल होत तर नाही म्हणून सांगा. लोकांना ते आवडते. पण खोटं बोलून झुलवत ठेवणं लोकांना आता पचनी पडत नाही. तेव्हा आपल्या नेत्यांनी व मंत्र्यांनी सुद्धा आता भान ठेऊनच बोलले पाहिजे. या विधान परिषदेच्या निवडणुकीत आपण एकोपा ठेवला, सहकारी मित्रांना विश्वास दिला त्यामुळेच काँग्रेसचा चौथा उमेदवार निवडून येऊ शकला. राष्ट्रवादीचा पाठिंबा मिळाला म्हणूनच मी विजयी झालो अशी प्रतिक्रिया जी विलास सावंत यांनी व्यक्त केली ती बोलकी व खूप बोध घ्यावी अशी आहे. भाजप-सेना हा पक्ष महाराष्ट्रात तुल्यबळ नाही. येथे आपली खरी लढत काँग्रेस पक्षाशीच आहे. आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी ताकद जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायतीच्या निवडणुकीतून जास्तीत जास्त दाखवा. शेवटी काँग्रेसला त्यांचा व आपल्याला आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढवायचा. गटातटाला ताकद मिळेल असं प्रकारचं वर्तन कुणाकडूनही होता कामा नये. आमच्या नावाखाली वेगवेगळ्या प्रकारची दुकाने कुणी सुरू करीत असेल तर त्याकडे लक्ष देऊ नका. आमचा त्याच्याशी काहीही संबंध नाही.

यावेळी झालेली इतर मान्यवरांची भाषणे :

## मधुकरराव पिचड, प्रदेशाध्यक्ष :

महाराष्ट्रातील दुष्काळी भागाच्या विकासाचा प्रश्न आपल्या पक्षाने सुरुवातीपासूनच प्रवाहीपणाने व प्रामाणिकपणे लाऊन धरलेला आहे. दुष्काळी भागातील जनतेला विकासाची आस आहे आणि त्यासाठी सिंचनाचे अपुरे असलेले, अर्धवट राहिलेले तसेच जे प्रकल्प अजून उभारायचे बाकी आहेत. त्यांची उभारणी तातडीने सुरू करून शेतीला पाणी उपलब्ध करून दिले पाहिजे. असा आग्रह व भूमिका सुरुवातीपासूनच घेऊन सिंचनासाठी भरीव तरतूद करण्याचे काम राष्ट्रवादीने केलेले आहे. केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार आणि राज्याचे जलसंपदामंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या प्रयत्नातून केंद्र सरकारमधून 'सिंचनवर्धित वेग प्रकल्प' (एआयबीपी) योजनेतून मोठ्या प्रमाणावर निधी आणण्यात आपण यशस्वी झालो आहोत. त्यातून कृष्णा खोऱ्यातील प्रकल्प पूर्ण करण्यास बरीच मदत झाली आहे. अजूनही कृष्णा खोऱ्यातील काही प्रकल्प पूर्ण व्हायचे असून, त्यांच्यासाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करून देण्याबाबत सरकार प्रयत्नशील आहे.

पश्चिम महाराष्ट्र हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला असला तरी येथे अजूनही आपल्याला पक्ष बलवान करण्यास खूप संधी आहे. कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी आपापले मतभेद विसरून एकदिलाने व संघटितपणाने पक्ष मजबूत करण्याचे काम करणे आवश्यक आहे. आपल्या पक्षात सक्रिय असणाऱ्यांमध्ये ५० टक्के युवक असून त्या सर्वांना निरनिराळ्या पदांची संधी देऊन विकास प्रक्रियेमध्ये सामील करून घ्यायचे आहे. ३० टक्के आरक्षण महिलांना आज उपलब्ध झाले असले तरी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण महिलांना द्यावयाचे आहे. अशा परिस्थितीत मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्या प्रशिक्षित कराव्या लागणार आहेत.






## जयंत पाटील (ग्रामविकासमंत्री) :

विधानसभेच्या निवडणुका होऊन आता जवळपास एक वर्ष होत आलेले आहे, तरी देखील वेगवेगळ्या समित्यांचे व महामंडळाचे पदाधिकारी आपण अद्याप नेमू शकलेलो नाही. वास्तविक निवडणुका झाल्यानंतर लगेचच या नेमणुका करून पक्षाचे सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी सक्रिय करणे आवश्यक होते. त्याबाबत अनेकदा जाहीरपणाने चर्चाही झाली. आश्वासने दिली गेली. परंतु अद्याप कृषि झालेली नाही. या कामात प्रदेशाध्यक्ष व संबंधितांनी तातडीने लक्ष घालून कार्यकर्त्यांच्या मनात असलेला असंतोष दूर करावा. महामंडळाचे पदाधिकारी नेमल्यानंतर त्यांनी पक्षाचे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक पदाधिकारी आज कुणाचे काम करतायेत हेदेखील कळायला मार्ग नाही. खऱ्या प्रामाणिक व निःस्वार्थी कार्यकर्त्यांनाच पदाची संधी दिली पाहिजे. कुणाला संधी द्यायची याविषयी जेव्हा प्रश्न निर्माण होतात त्यावेळेला विद्यमान पदाधिकाऱ्यांनी चांगल्या माणसाचे नाव पुढे आणणे आवश्यक आहे. आज अनेक कार्यकर्त्यांना तालुकाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष यांची मान्यता नसते. पक्षाला हे कार्यकर्ते किती सहाय्यभूत झाले, हे न तपासता त्यांना नेमणुका दिल्या जातात. पक्षाचा उमेदवार पाडला तरी पदे मिळत असतील तर पक्षविरोधी भूमिका घेतलेली चांगली, असाच गैरसमज कार्यकर्त्यांमध्ये वाढीला लागण्याची मोठी भिती आहे. पदाधिकारी नेमताना पक्षाने अंतर्गत चौकट तयार केली पाहिजे. ज्यांना नेमणुका देणार त्यांचे जनमानसांत, मतदारसंघात, तो राहतो त्या गावात व वॉर्डात नेमके काय स्थान आहे हे तपासले पाहिजे आणि संबंधित व्यक्तीला नेमणुकीबाबतचे शिफारस करणारे पत्र तालुका व जिल्हाध्यक्षांकडून घेतले पाहिजे. कार्यकर्त्याला जेव्हा आपण राजकीय संधी देतो तेव्हा पक्षालादेखील तितकेच महत्त्व निर्माण झाले पाहिजे. नुसते व्यक्तीचे महत्त्व वाढवून उपयोग नाही. पक्षाचे महत्त्व वाढविले तरच संबंधित पदाधिकारी हे तालुका, जिल्हा व गावच्या राष्ट्रवादी कचेरीत जाऊन बसतील. नेमणुका संबंधीचे कोणते मॉडेल आपण स्वीकारणार याबाबत गांभीर्याने विचार होण्याची आवश्यकता आहे. पक्षामध्ये तालुका व जिल्हा संघटनेचे महत्त्व वाढविण्याची गरज आहे. आज पक्ष कार्यालयापेक्षा मंत्र्यांच्या दालनात कार्यकर्त्यांची जास्त गर्दी आहे. त्याबाबतही योग्य तो फेरविचार व्हायला हवा.

## ‘पक्षाला समांतर संघटना नको’



**प्रा. लक्ष्मणराव ढोबळे** (पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री) :

गेल्या १० वर्षांत सत्तेत आल्यापासून आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सरकारमार्फत अनेक चांगले उपक्रम व निरनिराळ्या योजना राबविल्या आहेत. परंतु त्यांचा प्रचार व प्रसार करण्यात आपण व आपले कार्यकर्ते कमी पडत असल्यामुळे आपल्याला या कामाचे श्रेय मिळालेले नाही. काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपली छबी उत्तम पद्धतीने मतदारांसमोर ठेवली पाहिजे. त्यासाठी पत्रकारांशी चांगले संबंध ठेऊन पक्षाच्या माध्यमातून आपण लोकांसमोर गेलो पाहिजे. कार्यकर्त्यांनी नुसते नेत्यांभोवती हिंडण्यापेक्षा पक्षाभोवती कार्यकर्ता फिरला पाहिजे. पक्षाला समांतर असणारी वा पर्याय ठरू शकेल अशी कोणतीही संस्था व संघटना कोणत्याही परिस्थितीत जिल्हाध्यक्षांनी चालवू देऊ नये. महामंडळाचे पदाधिकारी आणि तालुका समन्वय समित्यांवरील कार्यकर्त्यांच्या नेमणुका अत्यावश्यक झाल्या असून त्या तातडीने करणे गरजेचे आहे. या नेमणुका करताना खरा काम करणारा कार्यकर्ता मागे राहणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. व्यसनमुक्त समाजाची निर्मिती हा राष्ट्रवादीचा संकल्प असला पाहिजे. त्या दृष्टीने कार्यकर्त्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## ‘कार्यकर्त्यांच्या कपाळी कुंकु लावा’



**इलियास नायकवडी,** (उपाध्यक्ष-महाराष्ट्र प्रदेश)

अनेक तरुण कार्यकर्ते पक्षाचे निष्ठेने काम करीत असताना सरकारच्या निरनिराळ्या समित्यांच्या माध्यमातून प्रशासनामध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक व आतुर झालेले आहेत. नवीन नटलेल्या नवविवाहिता मंगळसूत्राची वाट पाहात असतात तसे हे तरुण कार्यकर्ते तालुका, जिल्हा, राज्य पातळीपर्यंत प्रशासकीय कार्यात सहभागी होण्यासाठी वाट पाहात आहेत. तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते बिनकुंकवाचे राष्ट्रवादीशी गेल्या ११ वर्षांपासून संसार करीत आहेत. त्यांनाही कपाळावर कुंकु लागावे असे वाटणे स्वाभाविक आहे. राष्ट्रवादीचा कणा असणारे नेते या सर्व अपेक्षांचा निपटारा करतील अशी अपेक्षा आहे.

या संदर्भात मी एक गोष्ट सांगतो की, एका तरुणाला एका तरुणीशी लग्न करायचे होते. त्याने एका हस्तरेषातज्ज्ञाला हात दाखविला व या नात्याबद्दल पुढे काय होईल असे विचारले. त्यावेळी त्या हस्तरेषा तज्ज्ञाने त्याला सांगितले की तुझी ११ वर्षे कष्टात व अडचणीत जातील. तेव्हा त्या तरुणाने त्याला विचारले ते ठीक आहे. पण पुढे काय ते सांगाना. त्यावर तो ज्योतिषी म्हणाला, त्यानंतर तुला सवय लागेल. त्यामुळे पुढे काय होईल याचा फारसा विचार करण्याची गरजच नाही. काही नेते व कार्यकर्त्यांवर गंभीर स्वरुपाचे जे आरोप झाले त्याचा परामर्श घेताना श्री. नायकवाडी म्हणाले की सीतेलादेखील अग्नीपरीक्षा द्यावी लागली होती. अग्नीपरीक्षा देताना लोकांच्या टीकेला सामोरे जावे लागले होते. पण अग्नीपरीक्षेतून पार पडल्यानंतर ती पूजनीय बनली. त्याच पद्धतीने कार्यकर्त्यांनी अग्नी परीक्षेतून पार पडावे.



## ‘बाहेरच्या नेत्यांची लूडबूड नको’

### अंकुश काकडे

पुणे शहर, पिंपरी–चिंचवड व पुणे जिल्हा परिषदेत कामे करण्यासाठी, विकासासाठी श्री. अजितदादा पवार, खा. सुप्रिया सुळे ह्या भक्कम आहेत. कामे करुन घेण्यात हे दोघे सक्षम आहेत. असे असतांना पुणे जिल्ह्याबाहेरचे नेते पुण्यात येऊन लुडबुड करतात, पक्षाचे वातावरण गढूळ करतात हे योग्य नाही. त्यांनी हे उद्योग त्वरीत थांबवावे अन्यथा आम्हा कार्यकर्त्यांना त्यांना जाब विचारावा लागेल. वेळ पडली तर त्यासाठी पक्षशिस्त बाजूला ठेऊन रस्त्यावर येऊन त्यांना जाब विचारु. तेव्हा प्रांताध्यक्षांनी आम्हाला अडवू नये. म्हातारी मेल्याचे आम्हाला दुखः नाही, परंतु काळ सोकावतो आहे. त्याची दखल घेणे गरजेचे आहे, असा इशारा मी देऊ इच्छितो.

# कोल्हापूर राष्ट्रवादीवर पालकमंत्र्यांकडून अन्याय

### के. पी. पाटील :

**(आमदार - राधानगरी, कोल्हापूर)**

चार महिन्यांपूर्वी राष्ट्रवादीच्या कोल्हापूर जिल्हा अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारुन कार्यकारिणी पूर्णत्वाला नेली आहे व तालुक्यांचे अध्यक्ष नेमून मेळावे चालु केले आहेत. दरम्यान दोन सहकारी साखर कारखान्यांच्या जिल्ह्यात निवडणुका झाल्या. त्यात निम्मा जिल्हा ढवळून निघाला. कोल्हापूर जिल्ह्यात सध्या राष्ट्रवादीचे वारे जोमाने वाहात असून पक्षीय पातळीवरची निवडणूक पद्धत कमी झाली होती. ती पुन्हा वेगाने सुरु करण्याचा विचार करीत आहोत. त्या दृष्टीने प्रदेश पक्षाने बळ दिले तर महानगरपालिकेच्या निवडणुका पक्षीय पातळीवर लढविता येतील व त्यात बऱ्यापैकी यश मिळेल असा अंदाज आहे. मागील निवडणुकीत अपेक्षेसारखे यश मिळाले नाही त्यामुळे काँग्रेस पक्षाशी युती करुन आघाडीचा कारभार चालु ठेवावा लागलाय.

सक्षम कार्यकर्त्यांच्या नेमणुका समित्यांवर होत नाहीत अशी चर्चा कार्यकर्त्यांमध्ये चालू असून मोठी रुखरुखही त्यामुळे पहावयास मिळत आहे. सांगली जिल्ह्यात दोन आमदार निवडून आले आणि चार विधान परिषद सदस्य नेमले गेले आहेत. सगळी संधी सांगलीलाच दिली जाते त्याबद्दल माझी तक्रार नाही. पण अशी संधी कोल्हापूर जिल्ह्यालादेखील मिळाली तर आमच्याही जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस भक्कम होऊ शकेल. आमच्या कोल्हापूर जिल्ह्याला आयात केलेला पुण्याचा पालकमंत्री नेमला आहे. तो राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात असल्यामुळे आम्हाला न्याय मिळत नाही. संजय गांधी व इतर कमिट्यांवरील कार्यकर्त्यांच्या नेमणूका केवळ पालकमंत्र्यांच्या हट्टामुळे झालेल्या नाहीत. स्थानिक गोरगरीब माणसांना न्याय देणाऱ्या कमिट्या स्थापन होत नाहीत आणि स्पष्ट बोलले तर मंत्र्यांना वाईट वाटते. फौजदार, पी.एस.आय. यांची मंत्र्यांकडे बदली मागीतली तर आम्हाला गुन्हेगार समजले जाते. पश्चिम महाराष्ट्र हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला आहे. हसन मुश्रीफ रोज २४ तास लोकांची कामे करताहेत पण मतदारसंघात घुसून काम करण्याची गरज आहे. तिथे थोडी ताकद कमी पडते आहे. विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या नेमणुका झालेल्या नाहीत. निम्म्या झाल्यात. निम्म्या तशाच आहेत.

कोल्हापूर हा सहकारातला प्रबळ जिल्हा आहे. पण



*बैठकीला निमंत्रित करण्यात आलेले पुणे विभागातील राष्ट्रवादीचे प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी.*

त्या जिल्ह्यापुरते राज्यमंत्र्यांचे अधिकार काढून घेतले आहेत. पालकमंत्री हे स्वतःला सोनिया गांधींचे पट्टशिष्य म्हणवतात. त्यांचे सहकार खाते तरी काढून घ्या अन्यथा राज्यमंत्र्याला अधिकार परत द्या. पालकमंत्र्यांकडून आमच्यावर प्रचंड अन्याय होतो आहे. काँग्रेसची कुरघोडी किती काळ सहन करायची? पक्षसंघटना खिळखिळी करण्याचे काम काँग्रेसकडून चालू आहे. आपण ते चालू देता कामा नये. वेळ आली तर आघाडी मोडावी लागली, सत्ता सोडावी लागली तरी हरकत नाही पण पक्ष भविष्याच्या दृष्टीने मजबुत करणे अधिक गरजेचे आहे. पुढच्या निवडणुकीत कोल्हापूर महानगरपालिकेत बऱ्यापैकी नगरसेवक निवडून आणू. आमच्यापुढे खरे आव्हान काँग्रेस पक्षाचेच आहे. आमचा नंबर एकचा शत्रू काँग्रेसच आहे. तेव्हा काँग्रेसला रोखण्यासाठी राष्ट्रवादीला कोल्हापूरात मजबुत करावे लागेल त्याकडे नेत्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

सांगली जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष विलासराव शिंदे यांनी स्वागत केले. कै. राजारामबापु पाटील यांचे स्मारक असलेल्या कासेगावातील 'पदयात्री' या स्थळी झालेल्या बैठकीमागील पार्श्वभूमी वसंत वाणी यांनी विषद केली. यावेळी सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, सोलापूर जिल्हाध्यक्ष मनोहर डोंगरे, पुणे जिल्हाध्यक्ष सुरेश घुले, पिंपरी-चिंचवडचे अध्यक्ष व महापौर योगेश बहल, पुण्याचे महापौर मोहनसिंग राजपाल, विक्रमबाबा पाटणकर, सौ. लिलाताई जाधव, धैर्यशील माने, नंदकुमार गोसावी, ताजुद्दीन तांबोळी, सुरेश आटोळे, स्मिता परदेशी व इतर मान्यवरांची भाषणे झाली. राष्ट्रगीताने बैठकीची सांगता झाली.

■■■



# राष्ट्रीयस्तरावर पाण्याबद्दलची अनास्था

- डॉ. दि. मा. मोरे

नुकतीच राष्ट्रीय सल्लागार परिषेदवर देशातील १३ तज्ज्ञांची नियुक्ती झाल्याची बातमी वर्तमानपत्रातून वाचण्यात आली. याच परिषदेला काँग्रेस अध्यक्षा सोनीया गांधी यांचे 'मिनी कॅबिनेट' म्हणून ओळखले जात असल्याचे पण समजले. बातमी वाचून आनंद झाला. राज्यकर्त्यांना, सत्ताधाऱ्यांना, देशाला व समाजाला हितकारक असे निर्णय घेण्यासाठी त्या त्या विषयातील तज्ज्ञ, जाणकार, अनुभवी व निरपेक्षपणे सल्ला देणाऱ्यांची नितांत गरज असते. मंत्रालयामध्ये सचिवाने आणि बरोबरच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी हे काम करावं असं अपेक्षित असतं. भारत हा खंडप्राय देश आहे. ६० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या शेती आणि त्यावर आधारित वेगवेगळ्या व्यवसायांवर उदरनिर्वाह करीत आहे. गेल्या काही वर्षात राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा झपाट्याने घसरला आहे. तो १५ टक्क्यांपर्यंत असावा अशी माहिती पुढे येत आहे. म्हणजेच ६० टक्क्यांपेक्षा जास्त लोकाचं उत्पन्न देशाच्या एकूण उत्पन्नाच्या १५ टक्क्यांवर आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील सर्वात मोठा वाटा (५५ टक्क्याच्या आसपास) सेवा क्षेत्राचा आहे आणि उर्वरित वाटा हा उद्योग क्षेत्राचा आहे असे चित्र उपलब्ध आकडेवारीवरून समजते. सेवा क्षेत्राशी निगडीत लोकसंख्या तुलनेने फार कमी असावी. म्हणजेच या क्षेत्रात काम करणाऱ्याचे दरडोई उत्पन्न शेतीशी निगडीत असणाऱ्या लोकांपेक्षा कितीतरी पटीने जास्त असणार.

ही विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज

आहे. शेतीची उत्पादकता वाढवणे, शेतीतील खर्च कमी करणे आणि शेतीतील उत्पादनाला किफायतशीर भाव मिळणे ही काही उत्तरे पुढे येतात. केंद्र सरकारने नेमलेल्या अर्जुन सेन गुप्ता या तज्ज्ञांच्या अध्यक्षतेखालील समितीने काढलेले निष्कर्ष तर फार विदारक आहेत. भारतातील ७६ टक्के लोकांचा दरडोई दरदिवसाचा खर्च रू.१७ पेक्षा जास्त नाही. यापैकी जवळजवळ निम्म्या लोकांचा खर्च रू.९ पर्यंत आहे अशीही माहिती पुढे आली. देशातील जवळजवळ ८० टक्के शेतकऱ्यांकडे दोन हेक्टरपर्यंत शेतजमीन आहे असं देशाच्या कृषी मंत्र्याकडून वारंवार ऐकवण्यात येतं आणि ही वस्तुस्थिती आहे. जगाच्या तुलनेत देशातील वेगवेगळ्या पिकांची दर हेक्टरी सरासरी उत्पादकता जवळजवळ निम्मी आहे. शेती व्यवसाय न पेलल्यामुळे देशाच्या वेगवेगळ्या भागात विशेषत: महाराष्ट्राच्या विदर्भ भागात शेतकरी आत्महत्या करीत आहेत, हे ही वाचण्यात येत आहे.

पाणी हा शेतीचा प्राण आहे. पाण्याशिवाय शेती केली जाऊ शकत नाही. कोरडी शेती होत नाही आणि म्हणून कोरडवाहू शेती हा शब्दप्रयोग अशास्त्रीय आहे. पाऊस हा अनियमित आहे. हा ठराविक कालावधीतच पडतो. देशाच्या काही भागात वर्षाकाठी ३० ते ४० सच दिवस पावसाचे असतात. पर्जन्याधारित शेती हा जुगार आहे. म्हणून शेतीतून उत्पादन काढण्यासाठी पावसाव्यतिरिक्त पाण्याचा आधार देण्याशिवाय पर्याय नाही. पाण्याशिवाय पिकाची वाढ होत नाही कारण पाण्याद्वारेच पिक जमिनीतील अन्नद्रव्ये शोषून घेत असते. जमीन खूपच चांगली सुपिक आहे पण पाणी, ओलावा जर नसेल तर पिक वाढत नाही हे वैज्ञानिक सत्य आहे. याच कारणास्तव भारतासारख्या हंगामी पाऊस पडणाऱ्या देशात मानवनिर्मित लहान, मोठे जलसाठे निर्माण करण्याची गरज भासते. या देशाचा इतिहासपण तेच सांगतो. शेकडो, हजारो वर्ष जुन्या तलावाची संख्या लाखांमध्ये होती. आजपण ७-८ लक्ष जुने, इतिहासकालीन तलाव आपल्या देशात आहेत आणि त्याच्या आधाराने शेतीचा, पिण्याच्या पाण्याचा आणि इतर बाबींचा प्रश्न सोडविला जात आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हजारो, लाखों लघु, मोठे जलसाठे निर्माण करण्यात आलेले आहेत. आणखी लाखो साठे निर्माण करावयाचे आहेत. त्याशिवाय पर्याय नाही. पृष्ठभागावरील जलाशय, भूजल, नद्या जोडणे, पाणी उचलणे इ. वेगवेगळया पर्यायाने शेतीला पाणी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पाण्याच्या इष्टतम वापरासाठी आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर करणेही तितकेच गरजेचे आहे. पिकाच्या वाढीला लागतं तेवढं पाणी देण्याचा हा एकमेव मार्ग आहे आणि उत्पादनवाढ याच आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शक्य आहे. याची प्रचिती अनेक प्रयोगावरून आलेली आहे. शेतकऱ्यांनापण हे पटलेलं आहे.

जगात लागवडीखाली आणि सिंचनाखाली सर्वात जास्त क्षेत्र असलेला भारत हा देश आहे. पण सुधारलेल्या देशांच्या तुलनेत आधुनिक सिंचन व्यवस्थेखाली (ठिबक, तुषार, डिफ्युजर ई.) सर्वात कमी प्रमाण असलेला पण आपलाच देश आहे. या दिशेने आपल्याला खूप मोठी मजल मारावयाची आहे. सर्व फळबागा, ऊस, कापूस, भाजीपाला, नजीकच्या काळात



*पवित्र मानल्या गेलेल्या गंगा नदीतील प्रदूषण किती प्रचंड व भयानक आहे हे दर्शविणारे छायाचित्र.*

द्रुतगतीने सिंचनाच्या आधुनिक तंत्राखाली आणावयाचे आहे. या बरोबरच गहू, डाळ, गळीत धान्य, ही पिकेपण याच पद्धतीखाली आणण्याशिवाय पर्याय नाही. अनेक लाभाबरोबर या आधुनिक सिंचनपद्धतीचा सर्वात मोठा लाभ म्हणजे उत्पादकतेत तिप्पट, चौपटीने वाढ आणि पाण्याची निम्मी बचत. भारतासारख्या देशाला उत्पादन वाढविण्यासाठी या शास्त्रीय पर्यायाशिवाय पर्याय नाही.

या देशाला पिण्याचा पाण्याचाही प्रश्न सातत्याने भेडसावत आहे. शेतीसाठी भूजलाचा अतिउपसा होत असल्यामुळे ग्रामीण भाग पिण्याच्या पाण्यापासून वंचित होत आहे. दरवर्षी खेडी टँकरमुक्त करण्याचा प्रयत्न केला जातो पण परिणाम उलटच होत आहे. टँकरग्रस्त खेड्याची संख्या वाढत आहे. याचवर्षी महाराष्ट्रातील निम्मी खेडी पिण्याच्या पाण्याच्यादृष्टीने अडचणीत आलेली होती. देशाच्या वेगवेगळ्या ग्रामीण भागातील परिस्थिती यापेक्षा वेगळी नसावी. शहराला पाणी पुरवठा करणारे जलाशय आटल्यामुळे नागरी वस्त्यांना पण पिण्याचा पाण्याचा प्रश्न काळजीचा होत आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांच्या आणि तालुक्यांच्या ठिकाणी सरसकटपणे आठवड्यातून दोन किंवा तीन वेळाच अर्धा-एक तासासाठी पाणी पुरवठा केला जात होता. जळगांव, उदगीर, अहमदपूरसारख्या ठिकाणी आठवड्यातून एकदाच पाणी पुरवठा होत होता अशाही बातम्या कानावर आल्या. जुन्या, पारंपारिक भूजलावर आधारित साधनांकडे टोकाचे दुर्लक्ष केल्यामुळे शहरेपण पंगु झालेली आहेत. उद्योग व्यवसायांनी तर पाण्याच्या गुणवत्तेच कंबरडच मोडल आहे. पाहिजे तेवढे पाणी प्राधान्यक्रमाने ओरबडणे आणि रसायनमिश्रीत, प्रदूषित पाणी जसंच्या तसं नदी-नाल्यात सोडून जमिनीवरील व भूगर्भातील पाणी मानवी उपयोगासाठी अपात्र करणे हा उपक्रम सातत्याने अखंडपणे त्यांच्याकडून राबविला जात आहे.

एकूणच पाण्याच्यादृष्टीने देशातील चित्र चिंतेच झालेलं आहे. पाण्याच्या प्रदूषणाचा प्रश्न अक्राळ-विक्राळ झालेला आहे. देशातील कोणतीही नदी ओंजळभर पाणी पिण्यासाठी देण्यासारखी राहिलेली नाही. देशाच्या राजधानी दिल्लीजवळील यमुना नदी विष वाहिनी झालेली आहे. महाभारतकालीन कालिया नागाची आठवण प्रकर्षाने होत आहे. सांडपाणी प्रक्रियेविना नदी-नाल्यात सोडणे चुकीचे आहे हा भाव कोणाही भारतीयामध्ये रूजला नाही. नद्या या प्रदूषित करण्यासाठीच निसर्गाने पृथ्वीवर निर्माण केल्या आहेत अशाच अहंभावामध्ये गेले ५०-६० वर्षांपासून आपण भारतीय वागत आहोत. गेल्या २० वर्षांपासून गंगा नदीला शुद्ध करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.



पण यश आलेलं नाही कारण जिद्दीने आणि प्रामाणिक प्रयत्न झालेले नाहीत असचं म्हणावं लागेल. देशाच्या पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखालीच समिती नेमून गंगेचे शुद्धीकरण करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे. प्रत्यक्षात जमिनीवर कार्यवाही कशी होणार आहे हे येणारा काळच सांगेल. सांडपाणी आणि घनकचरा ही या खंडप्राय देशापुढील आव्हाने आहेत व हे प्रश्न सोडविण्याची मानसिकता आपण गमावून बसलो आहोत.

या देशाच्या बहुसंख्य लोकांच्या किमान गरजा भागवून जिवनमान सुखी-समाधानी करण्यासाठी पाणी हा कळीचा मुद्दा आहे. त्याचे नियोजन आणि व्यवस्थापन हे शास्त्रीय पद्धतीने करण्याशिवाय पर्याय नाही. मध्यंतरीच्या काळात केंद्रसरकारने नदीजोड प्रकल्प मार्गी लावण्याचा प्रकल्प हाती घेण्याचा निश्चय केलेला होता. त्यादृष्टीने कार्यवाही पण चालू झालेली होती. पाण्याच्या दृष्टीने संपन्न असणाऱ्या नदी खोऱ्यातील पाणी, पाण्याची चणचण असणाऱ्या नदी खोऱ्यात आणण्याचा विकल्प कार्यान्वित करण्याचा मनोदय प्रत्यक्ष कार्यवाहीतून व्यक्त करण्यात आला होता. नुकतेच असे समजले की हा नदीजोड प्रकल्प कार्यवाहित आणणे अनेक दृष्टीने अव्यवहार्य ठरत आहे आणि म्हणून तो बाजूला ठेवण्यात आला आहे.

पाण्याच्या संबंधात असे अनेक या देशाच्या

जडघडणीशी निगडीत पैलू आहेत. पाणी प्रश्नाची सोडवणूक म्हणजेच या देशाच्या करोडो लोकांच्या जगण्याच्या प्रश्नाची सोडवणूक असा त्याचा सरळ अर्थ आहे. बाहेरील देशाशी, राज्या-राज्यातील, थेट गांव, तालुका पातळीपर्यंत आपापसातील पाणी वाटपाचे प्रश्न अतिरेकी स्वरुप धारण करीत आहेत. पाणी वाटपात विषमता रुजली आहे. समन्यायी पाणी वाटप, पाण्याची मोजणी ई. बाबींचा अवलंब करण्याच्या मानसिकतेपासून आपण खूप दूर आहोत. पाणी काल महत्त्वाचं होतं आज आहे आणि उद्यापण राहणार आहे. पाण्याला कोणाताही 'पर्यायी उपाय' नाही कारण पाणी हेच जीवन आहे.

ही वस्तुस्थिती असतानापण राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या रचनेवर नजर टाकल्यानंतर असे दिसून येते की १३ नियुक्त केलेल्या तज्ज्ञांपैकी कोणीही 'जलतज्ज्ञ' नाही. देशाला दोन पावले पुढं घेऊन जाण्यासाठी सल्ला देणारी ही परिषद आहे आणि पाण्याविना ही परिषद देशाला समृद्धीकडे घेऊन जाणार आहे असं समजायचं का? या तज्ज्ञांच्या परिषदेवर महाराष्ट्रातून दोन मान्यवर नियुक्त झालेले आहेत. डॉ.नरेंद्र जाधव हे शिक्षण व दलितांच्या प्रश्नाचा मागोवा घेण्यासाठी तर डॉ. माधव गाडगीळ हे पर्यावरणीय पैलूचा पाठपुरावा करण्यासाठी. आपल्या देशाला अन्न सुरक्षेचा प्रश्न भेडसावत आहे असं आपण नेहमी म्हणतो. दलित, आदिवासी, मागासलेले लोक, गरीब लोक अर्धपोटी जीवन जगत आहेत. ही वस्तुस्थिती आहे. देशातील जवळजवळ ४० टक्के लोक हे दारिद्र्य रेषेखालील आहेत असं केंद्र सरकारच्याच समिती अहवालावरून समजतं. कौशल्य विकासात हा तरूणाचा देश जगाच्या तुलनेत फारच मागे आहे. चांगल्या रोजगाराच्या बाजारपेठेत काम करण्यासाठी देशातल्या जवळ जवळ ९० टक्के तरूणांमध्ये गुणवत्ता आणि कौशल्याचा अभाव आहे अशीही माहिती पुढे येते. जागतिकस्तरावर कौशल्य गुणाची सरासरी २५ टक्क्यांच्या आसपास आहे तर भारतात ती केवळ १० टक्क्यांच्या आसपास आहे. काही वर्षांपूर्वी चीन आणि भारत कौशल्य विकासात बरोबरीने मागे होते पण चीन आज २५ टक्क्यांच्या आसपास आहे. तर दक्षिण कोरीयाने रोजगारक्षम लोकांमध्ये कुशलपणा आणण्यात भरारी मारलेली आहे आणि ते प्रमाण ९० टक्क्यांच्या आसपास आहे. आपल्या देशातील ५० कोटी तरूणांचा तांडा कुशलतेअभावी बेरोजगार राहण्याची भिती अनाठायी ठरणारी नाही. फारच मोठे काम या क्षेत्रात करण्याची गरज आहे हे यावरून लक्षात येते. शेती, पाणी या क्षेत्रामध्ये अनेक साध्या व सोप्या बाबी हाताळण्यासाठी लागणारा कुशल कामगारवर्ग ग्रामीण भागात अभावानेच मिळतो. पाण्याचा पंप जर बंद पडला तर त्याच्या दुरूस्तीसाठी त्या नडलेल्या शेतकऱ्याला २०-२५ कि.मी. चा प्रवास करून पंप दुरूस्त करून घ्यावा लागतो. अशी दयनीय अवस्था ग्रामीण भागात आहे. देशात बेरोजगाराचे तांडे करोडोमध्ये आहेत पण कुशल हात असणारा कामगारवर्ग लाखोंमध्येच मोजावा लागत आहे. हे विदारक चित्र बदलावे लागणार आहे.

या मिनी कॅबिनेटच्या बैठकीतील अजेंड्यावरचा अग्रक्रमावरील विषय अन्नसुरक्षा आहे असेही समजले. पाण्याचा विचार न करता अन्नसुरक्षेचा विचार कसा करणार आहात? या प्रश्नाचं उत्तर या मिनी कॅबिनेटनेच द्यावं असं सुचवावसं वाटतं. पाण्याविषयीची अनास्था म्हणजेच देशाच्या कळीच्या प्रश्नाविषयीची असंवेदनशीलताच म्हणावी लागेल. राष्ट्रीय सल्लागार समितीची बातमी बाहेर पडून पंधराएक दिवसाचा काळ लोटलेला आहे. मला वाटले कोणीतरी शासनातील, राजकारणातील व्यक्ती, अधिकारवाणीनं या गंभीर त्रुटीवर बोट ठेवेल. पण तसे घडले नाही. त्यामुळे वेदना झाल्या. आपल्या देशातील नडलेल्या लोकांचे प्रश्न सोडविण्याची खरोखरच इच्छा आणि प्रयत्न हा देश चालविणाऱ्या मंडळीकडे नाही का? असाही प्रश्न विचारावासा वाटतो.

पाण्याला दुर्लक्षित करू नका. पाणीविकासाशिवाय हा देश पुढे जाणार नाही. शेतीची भाषा पाण्याला विसरून करण्याचं धाडस आपल्या अंगी येता कामा नये. आधी पाणी निर्माण करा. त्याचं नियोजन करा. त्याच्या व्यवस्थापनाची जबाबदारी स्विकारा आणि मग कृषी विकास, उत्पादनात वाढ, अन्नसुरक्षा इ. विषय हातात घ्या. अन्नसुरक्षा मिळविण्यासाठी उत्पादनातील वाढ हे एकमेव उत्तर नाही. याचं भान ठेऊन असं म्हणावंस वाटतं की हा प्रश्न सोडविण्यासाठी ही आवश्यक बाब आहे. या राष्ट्रीय परिषदेवर अन्न, कृषी, रोजगार, जातीय हिंसाचार, ग्रामीण विकास, सामाजिक सुरक्षा व विकास, महिला, उद्योग, शिक्षण, पर्यावरण, दलित इ. प्रमुख विषयाचा पाठपुरावा करण्यासाठी वेगवेगळ्या तज्ज्ञांची नेमणूक करण्यात आलेली आहे पण या सर्व व्यवस्थेचा जो प्राणवायू आहे तो म्हणजे पाणी, या विषयाचा पाठपुरावा करणारा तज्ज्ञ राष्ट्रीय सल्लागार परिषेदला मिळाला नाही का? असा प्रश्न विचारावासा वाटतो. पाण्यातून निर्माण झालेल्या प्रश्नाच्या मालिकेवर लक्ष गेल्यानंतर राष्ट्रीय सल्लागार परिषदेतील पोकळी समोर आली म्हणून हा शब्दप्रपंच.

■■■

# सहकार चळवळ जागतिक पातळीवर जावी



**- ना. जयंत पाटील**

''आपल्याकडील खासगी साखर कारखानदार जगाच्या पाठीवर जाऊन साखर कारखान्यांची निर्मिती करत आहेत. याच धर्तीवर सहकार चळवळीनेही जागतिक पातळीवर जाऊन साखर कारखाने काढण्याचा विचार का करू नये, असा प्रश्न उपस्थित करून जगाच्या पाठीवर होणाऱ्या संशोधनाचा वापर केल्यास आपण कधीही मागे राहू शकत नाही'', असे मत ग्रामविकासमंत्री जयंत पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाच्या वतीने सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल दिला जाणारा 'नरुभाऊ लिमये स्मृती-आर्यभूषण पुरस्कार' जयंत पाटील यांना प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. ऊर्जा व जलसंपदामंत्री अजित पवार यांच्या हस्ते पाटील यांना हा पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी विधान परिषदेचे माजी उपसभापती वसंत डावखरे, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाचे अध्यक्ष अंकुश काकडे, आमदार वल्लभ बेनके, आमदार गिरीश बापट, उर्वरित वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आमदार उल्हास पवार व मुद्रणालयाचे उपाध्यक्ष रामचंद्र मर्गज उपस्थित होते.

गेल्या चाळीस वर्षांमध्ये महाराष्ट्रात सहकार चळवळ जेवढी रुजली तेवढी देशात अन्यत्र कुठेही रुजली नसल्याचे सांगून पाटील म्हणाले, सहकार क्षेत्रावर गेल्या काही वर्षांमध्ये टीका करणे हा एक प्रकारचा साचा होऊन बसला आहे. गेल्या चाळीस वर्षांपासून या क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात दबदबा होता, मात्र आत त्यावर मर्यादा येत आहेत. सहकारी साखर कारखान्यांबरोबरच बँका, सुतगिरणी कारखाने यांसारख्या उपक्रमांवरही त्याप्रमाणे मर्यादा आल्या आहेत. तरीही सध्या इतर राज्यांप्रमाणे आपल्याकडेही साखळी साखर कारखान्यांची निर्मिती होऊ लागली आहे. आता तर खासगी साखर कारखानदार या क्षेत्रात शिरत असून, त्यांनी हा उद्योग जगभरात करण्यात सुरुवात केली आहे. त्याप्रमाणेच सहकार चळवळीनेही जगभर पोहोचण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. राजारामबापू पाटील यांचे लोकाहितकारी कार्य व कार्यकर्त्यांचे कष्ट यामुळे हा पुरस्कार महत्त्वाचा वाटत असल्याची कृतज्ञताही त्यांनी व्यक्त केली.

श्री. पाटील पुढे म्हणाले की, नरूभाऊ लिमये हे एक खऱ्या अर्थाने अभ्यासपूर्ण व समन्वयवादी असे पत्रकार होते. ते 'विशाल सह्याद्री' या दैनिकाचे विश्वस्त होते. त्यानंतर त्यांनी 'गतीमान' हे वैचारीक साप्ताहिक जोमाने चालविले. महात्मा गांधींच्या विचाराने, धैयवादाने भारलेले, सत्तानिरपेक्ष असे प्रचारक म्हणून त्यांनी आपले जीवन व्यतीत केले. आजकाल प्रचारक ही संज्ञाच कुठे जाणवत नाही. नरूभाऊंनी राज्यकर्त्यांशी जवळीक ठेवली पण त्याचा व्यक्तिगत लाभ त्यांनी कधी घेतला नाही. सर्वसामान्यांची मते त्यांच्यात

जाऊन ते समजून घ्यायचे व त्याआधारे राज्यकर्त्यांना ते सुनवायचे. त्यांचा एक नैतिक असा धाक राज्यकर्त्यांवर शेवटपर्यंत होता. 'गतीमान' चालवताना त्यांनी गतीमान कारभार केला पण, त्यांनी कधी आक्रमक भाषा वापरली नाही. संयमीत, अभ्यासपूर्ण आणि समन्वयवादी अशी त्यंची पत्रकारीता होती.

पुण्यातील सुप्रसिद्ध 'आर्यभूषण प्रेस' बंद पडल्यानंतर त्याचा नावलौकिक टिकून राहावा म्हणून त्यांनी 'महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय' ही संस्था स्थापन केली आणि आर्यभूषण प्रेस चालवायला घेतला. आपल्या उतारवयात ही संस्था चालवायला घेतली असली तरी, आपले सर्वस्व मानूनच त्यांनी काम केले व संस्थेला उर्जीत अवस्थेत आणले. तेथील कामगारांच्या पालन पोषणाची सर्व जबाबदारी त्यांनी पित्याप्रमाणे स्वतःच्या अंगावर घेतली. त्यांचेसाठी गृहनिर्माण संस्था, पतसंस्था निर्माण केली. त्यांची विश्वासार्हता एवढी मोठी होती की, सरकार बदलले तरी तेथील कामे त्यांनाच मिळायची. संस्थेला एक उच्च दर्जाची प्रतिष्ठ त्यांनी प्राप्त करुन दिली. त्यामुळे 'आर्यभूषण पुरस्कार' हा एक स्वतःचा गौरव समजला जातो.

'आजार झाल्यानंतर मी डॉक्टरकडे जात नाही, तर लक्षणे दिसायला लागली की, मी लगेच डॉक्टरकडे जातो' असे नरूभाऊ नेहमी सांगत असत. त्यामुळे त्यांची तब्येत ठणठणीत होती. याच पद्धतीने त्यांनी समाजाकडे पाहिले. सामाजिक असंतोषाची, उद्रेकाची लक्षणे दिसताच नरूभाऊ निर्भिडपणे त्यावर औषध देत असत व राज्यकर्त्यांची कानउघडणी करीत असत. सार्वजनिक जीवनातील चारित्र्य त्यांनी अतिशय सचोटीने जपले होते.

हा पुरस्कार या वर्षी सकाळचे संपादक श्री. सुरेशचंद्र पाध्ये यांना देण्यात येत आहे. पुण्याच्या सांस्कृतीक चळवळीत पाध्ये यांचा सकाळच्या माध्यमातून फार मोठा वाटा आहे. नरूभाऊंनी पण साहित्य, कला, राजकारण नेमस्तपणे केले. संगीत रंगभूमी जपावी यासाठी प्रयत्न केले. काही काळ त्यांनी भरतनाट्य मंदीराचे अध्यक्षपदही भूषवले आहे. असा समसमा संयोग या पुरस्काराच्या निमित्ताने आलेला पाहायला मिळतो.

दुदैवाने नरूभाऊंसारखी अभ्यासपूर्ण, संयमीत, समन्वयवादी पत्रकारीता आज अभावाने आढळते. त्या दृष्टीने पत्रकारांनी अवलोकन केले पाहिजे असे आज या प्रसंगी नरूभाऊंची आठवण ठेवून मला सुचवावेसे वाटते. आजकाल पक्षकार-मग ते प्रिंट मिडीया असो वा इलेक्ट्रॉनिक मिडीया असो - फक्त सेलिब्रिटीजनाच महत्त्व देताना दिसतात. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्याला महत्त्व दिले जात नाही. एक प्रकारचा उथळपणा पत्रकारीतेत आलेला जाणवतो. राजकारणात अनिष्ट प्रवृत्ती आहेत. पेड न्यूज, अभ्यास नसणे,



*कै. नरुभाऊ लिमये सहकारिता पुरस्कार ना. जयंत पाटील यांना प्रदान करताना ना. अजित पवार, शेजारी महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाचे अध्यक्ष श्री. अंकुश काकडे, उपाध्यक्ष आर. टी. मर्गज.*



*कै. नरुभाई लिमये पत्रकारिता पुरस्कार श्री. सुरेशचंद्र पाध्ये यांना प्रदान करताना ना. अजित पवार, शेजारी श्री. वसंतराव डावखरे.*

उथळपणाकडे कल, प्रांतवाद, जातीयवाद इत्यादी अनिष्ट प्रवृत्ती राजकारणात दिसतात. त्या दूर करणे हे खरे तर पत्रकारांचे काम आहे. यासाऱ्या अनिष्ट गोष्टी तुमच्यात असू नयेत अशी अपेक्षा ठेवली तर ती वावगी ठरणार नाही.

नव्या पिढीतील पत्रकारांनी महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक, भौगोलिक इतिहासाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अलिकडेच नरेंद्र तिडके यांचे निधन झाले परंतु नव्या पिढीतील पत्रकारांना त्यांच्याबद्दल काही माहिती आहे असे त्यांच्या बातमीत कुठे जाणवले नाही. पत्रकारीतेतले बदल लक्षात घेऊन पक्षकारांचे वेळोवेळी प्रशिक्षण होते की नाही हे पाहिले पाहिजे. विविध कार्यशाळांना किती पत्रकार पूर्णवेळ हजर असतात ? पत्रकारांसाठी किती कार्यशाळा होतात ? आज घरबसल्या बातम्या मिळविण्याकडे पत्रकारांचा जास्त कल आहे. त्यातूनच फास्ट बातम्या देण्याच्या स्पर्धेत अनेक चुकीच्या बातम्या दिला जातात. नुकत्याच झालेल्या विधानपरीषद निवडणुकीत विजय सावंत यांच्या पराजय-विजयाची बाब समोर आहेच. जर्मन बेकरी प्रकरणात भटकल हा त्यातील आरोपी आहे असे पोलिसांनी कधीही सांगितलेले नसताना त्याबाबतच्या चुकीच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. या सर्व बाबींकडे पत्रकार सृष्टी लक्ष देणार की नाही?

यावेळी अजित पवार म्हणाले की, सध्याच्या काळात मतदार जागृत झाले असून आरोप-प्रत्यारोपांपेक्षाही विकासाला प्राधान्य देण्याची त्यांची भावना आहे. शहराचा झपाट्याने विकास होत असताना सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था देण्यासाठी पक्षीय भूमिका बाजूला ठेऊन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. अनेकांची मते ऐकून बहुमताचा निर्णय घ्यावा लागेल.

पवार पुढे म्हणाले की, लोकशाहीमध्ये अनेकांची मते ऐकून बहुमताचा निर्णय घ्यावा लागतो. घेतलेला निर्णय सर्वांना आवडेलच असा दावा करता येत नाही. प्रसंगी कडक भूमिका घेऊन कार्यकर्त्यांवर वचक ठेवावा लागतो. 'बीआरटी'ला अपेक्षित यश आले नाही. त्याची कारणे काय या खोलात आता जायला नको. पण बीआरटी यशस्वी व्हावी यासाठी चिकाटीने प्रयत्न सुरू आहेत. प्रसारमाध्यांचा आवाका आता प्रंचड वाढला आहे. शिक्षण आणि मनोरंजनाबरोबरच सर्वसामान्यांच्या आशा-आकांक्षाचे प्रतिबिंब दिसणाऱ्या माध्यमांकडे आपण आरसा म्हणून पाहतो. आज नरुभाऊ असते, तर त्यांनी राजकारण्यांना सोडले नसते. पण पत्रकारितेमध्ये चुकीचे काम करणाऱ्यांदेखील सांगितले असते.

विधानपरिषदेचे उपसभापती वसंत डावखरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले की, राजारामबापू पाटील यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून समाज घडविण्याचे काम केले. पुढे तोच वसा जयंत पाटील यांनी उत्तम पद्धतीने चालविला असल्याचे सांगितले. ज्येष्ठ पत्रकार एस. के. कुलकर्णी व जयराम देसाई यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंकुश काकडे यांनी केले, तर रामचंद्र मर्गज यांनी आभार मानले. प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केले.

■■■

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ११ वा वर्धापनदिन (क्षणचित्रे)



*राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ११ व्या वर्धापनदिनानिमित्त मुंबईतील राष्ट्रवादी भवनमध्ये प्रदेशाध्यक्ष मधुकरराव पिचड यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्याचे गृहमंत्री आर. आर. पाटील, सरचिटणीस गुरुनाथ कुलकर्णी, उपाध्यक्ष मदन बाफना, खजिनदार हेमंत टकले, मुनाफ हकीम, डॉ. गजानन देसाई, दिनकर तावडे, सेवादलाचे अध्यक्ष तुकाराम बिरकड, पक्षाचे सर्व पदाधिकारी व सेवादलाचे कार्यकर्ते उपस्थित होते.*



*पर्यावरणाचे महत्त्व पटविण्यासाठी अहमदनगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने चला सायकलकडे वळूया, पर्यावरणाचे रक्षण करूया, असा नारा देत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला पालकमंत्री बबनराव पाचपुते यांनी हिरवा झेंडा दाखविला. रॅलीत सिताराम देशमुख, अशोक बाबर, विनायक देशमुख, जिल्हाध्यक्ष घनश्याम शेलार, फारुक रंगरेज, अंबादास गारुडकर, संजय सपकाळ, सोमनाथ धूत, अरीफभाई शेख, अरविंद शिंदे, हरजितसिंह वधवा, हनीफ जरेवाला, किसन लोटके व इतर. पदाधिकारी.*







बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने वर्धापनदिनानिमित्त १०१ विद्यार्थ्यांना मोफत जातींचे दाखले राज्याच्या अल्पसंख्यांक विकास व शालेय शिक्षणमंत्री फौजिया खान यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष हबीब फकीह हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. अल्ताफ सय्यद यांनी पुढाकार घेऊन आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला सोहेल खान, आरिफ बागवान, नविदुज्जमा, बारामती शहर राष्ट्रवादीचे अध्यक्ष सुभाष ढोले, इम्तियाज शिकीलकर, पौर्णिमा तावरे व अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी अल्पसंख्यांक समाजाच्या वतीने शासन प्रयत्नशील असून अल्पसंख्यांकासाठी केलेली २०० कोटी रुपयांची तरतूद वाढविण्या-बरोबरच विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीतही वाढ करण्यासाठी केंद्र सरकारकडे जादा रकमेची मागणी करण्यात आली आहे, असे राज्यमंत्री फौजिया खान यांनी सांगितले.



राज्यातील प्रत्येक चित्रपटगृहात चित्रपट सुरू होण्यापूर्वी राष्ट्रगीत वाजविले जावे तसेच राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमा सर्व शासकीय कार्यालयात सक्तीने त्वरित लावण्यात याव्यात. या मागण्यांसाठी औरंगाबाद जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सेवादलाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे धरण्यात आले. त्यानिमित्ताने जिल्हाधिकाऱ्यांना सेवादलाचे अध्यक्ष दशरथ मानवतकर हे निवेदन देत असून, शेजारी अनिल पाटील, रशिदभाई, सोपान शेजवळ व इतर




राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलाच्या वतीने वर्धापनदिनानिमित्त ठाणे येथे राष्ट्रसन्मान आंदोलनाचा भाग म्हणून एकदिवसीय धरणे धरण्यात आले. यात सेवादलाचे प्रदेश उपाध्यक्ष जे. पी. सिंग, ठाणे महानगराध्यक्ष तस्वीर सिंग, ग्रामीण अध्यक्ष नरेंद्र पाटील, मिराभाईंदरचे श्री. खजूरिया, उल्हास नगरचे दीपक रोहरा व इतर पदाधिकारी सहभागी झाले होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस हेमराज शहा यांनी पक्षाच्या ११ व्या वर्धापनदिनानिमित्त १२ वीच्या परीक्षेत मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती, गणित, जीवशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्समध्ये सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित केला होता. त्याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष मधुकरराव पिचड, राजेश टोपे, अरुण गुजराथी, सचिन अहिर व हेमराज शहा उपस्थित होते.





महाराष्ट्र शासनाने रिक्षातून विद्यार्थी वाहतूक करण्यास बंदी करू नये असे निवेदन राष्ट्रवादीचे सरचिटणीस रवींद्र माळवदकर यांनी पुण्याच्या जिल्हाधिकारी चंद्रकांत दळवी यांना दिले. यावेळी शिवलाल भोसले, भाई कात्रे, अरुण रेणुकदास व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. १९५६ सालापासून पुणे शहरातील नागरिकांच्या वाहतूक सेवेसाठी रिक्षा पुण्यात दाखल झाली आहे. पुणेरी रिक्षा आणि पुणेरी रिक्षावाला हा केवळ शहराचा नागरिक नसून सांस्कृतिक अविभाज्य भाग बनला आहे.



राष्ट्रसन्मान आंदोलनातंर्गत प्रदेशाध्यक्ष पिचड यांना निवेदन देताना सेवादलाचे पदाधिकारी सर्वश्री दशरथ गायकवाड, जानबा म्हस्के आणि गणेश जयस्वाल, शेजारी खा. तारिक अन्वर आणि मुनाफ हकीम




वर्धापनदिनानिमित्त अहमदनगर जिल्हा राष्ट्रवादीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महिला आरोग्य शिबिराचे जिल्हाध्यक्ष घनश्याम शेलार दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन करीत असून शेजारी राजश्री मांढरे, शारदा लगड, महापौर संग्राम जगताप, रावसाहेब अनभुले, किसनराव लोटके, नामदेव पवार, अजित कुंदे, अजय चितळे व निर्मला मालपाणी




स्वयंरोजगार शिबिरात पर्यावरणाविषयीच्या हस्तपत्रकाचे ना. बबनराव पाचपुते प्रकाशन करताना. शेजारी घनश्याम शेलार, राजेश्री मांढरे, दादा कळमकर, अशोक बाबर, अंबादास गारुडकर, संदीप वर्पे व संजय सपकाळ.



वर्धापनदिनानिमित्त अहमदनगरच्या एमआयडीसीमधील सनफार्मा हायस्कूल नागापूर येथे वृक्षारोपण करताना अध्यक्ष घनश्याम शेलार, राजश्री मांढरे, रावसाहेब बारस्कर, शरद मद्दूर, दादा कळमकर, हानीफ जरीवाला, प्रशांत नेटके, राहूल मोहिरे, अजय चितळे






# फुटबॉल झंझावाताने क्रिकेट-टेनिसला झाकोळले...!



-मुकुन्द मोघे

*सार्‍या जगाचे लक्ष केंद्रित झाले आहे ते दक्षिण आफ्रिकेतील मैदानांवर चढत्या श्रेणीने रंगत चाललेल्या फुटबॉलच्या विश्वकरंडक स्पर्धेवरच! जगभरातील सर्वोत्तम बत्तीस संघांचा सहभाग असलेली ही चौसष्ट रोमहर्षक सामन्यांची स्पर्धा म्हणजे 'Greatest sporting show on Earth' असे म्हटले तर ते अजिबात अतिशयोक्तीचे ठरणार नाही. अर्थात आत्तापर्यंत झालेले बहुतेक सर्व सामने चुरसपूर्ण, झंझावाती खेळापेक्षा रेफरी व लाइन्समेनच्या सदोष निर्णयांमुळेच अधिक गाजले आहेत, हे दुर्लक्षून चालणार नाही.*

अनेक ऐतिहासिक घडामोडी आणि टेनिस-क्रिकेट बॅडमिंटनच्या 'ग्रॅण्ड स्लॅम' स्पर्धांप्रमाणे फुटबॉलची विश्वकरंडक स्पर्धा यामुळे जून महिन्यात खूपच अधिक रंगतदार व चुरसपूर्ण उत्साहाची राहिली. अर्थात त्यावर सर्वाधिक प्रभाव फुटबॉलच्या सामन्यांचा राहणार, हे अपेक्षितच होते. त्या खेळाच्या या विश्वव्यापी प्रभावामुळे 'फ्रेंच ओपन' व 'विंबल्डन'ची नशा तर यावेळी खूप कमी राहिलीच परंतु विशेष म्हणजे अन्य कोणत्याही खेळापेक्षा क्रिकेटमध्येच अधिक रस असलेल्या आपल्या देशातही दोन मोठ्या क्रिकेट स्पर्धांची दखल तशी अभावानेच घेतली गेली.







१) रोहित शर्मा
२) आशिष नेहरा
३) रविंद्र जडेजा

त्यापैकी पहिली मर्यादित षटकांच्या सामन्यांची स्पर्धा झाली ती झिंबाव्वेत! भारत-श्रीलंका आणि यजमान देश यांच्या संघांचा सहभाग असलेल्या या तिरंगी स्पर्धेचे विजेतेपद सुरेश रैनाच्या नेतृत्वाखालील भारतीय संघच जिंकेल, अशी सर्वसाधारण अपेक्षा होती. परंतु भरवंशाच्या म्हशीला टोणगा व्हावा, असे काही तरी घडले आणि विजेतेपदाची स्वप्ने पाहणारे रैना व त्याचे सहकारी स्पर्धेच्या उपांत्य फेरीतच गारद झाले. आयपीएल गाजविणारे युसुफ पठाण, मुरली विजय, अशोक दिंडा व आर. आश्विनसारखे ताज्या दमाचे युवा क्रिकेटपटू आपल्या लौकिकास साजेसा खेळ करू न शकल्याने झिंबाब्वेत भारताला श्रीलंकेविरुद्धचे दोन सामने तर गमवावे लागलेच पण झिंबाब्वेच्या दुबळ्या नवोदित संघाविरुद्धच्या दोन लढतीतही दारुण पराभव पत्करावा लागला. अर्थात धोनी, हरभजनसिंग, झहीर खान, सेहवाग व गौतम गंभीर हे पाच पराक्रमी पांडव संघात नसल्यामुळे भारताच्या वाट्याला हे अपयश आले हे तर उघडच आहे, परंतु प्रतिस्पर्धी दोन्ही संघांतही अननुभवी, नव्या चेहेऱ्यांचाच भरणा होता, हे दुर्लक्षून चालणार नाही. रोहित शर्माची दोन सुरेख शतके आणि जडेजाचा अष्टपैलू खेळ, हीच काय ती भारताची या स्पर्धेतील एकमेव जमेची बाजू राहिली.

दरम्यान, झिंबाब्वेच्या ब्रॅंडन टेलरने दोन शतके व एक अर्धशतक फटकावून सर्वाधिक धावा काढण्याचा मान मिळविला. त्याला त्याच्या सर्वच सहकाऱ्यांची उत्तम साथ मिळाल्यामुळे यजमान संघ उपविजेतेपदाचा मानकरी ठरला तर दिलशानच्या नेतृत्वाखालील श्रीलंकेने विजेतेपद पटकावले.

## आशिया करंडक भारताकडे

झिंबाब्वेतील निराशाजनक कामगिरीनंतर भारतीय संघ 'आशिया करंडक' स्पर्धेसाठी श्रीलंकेला रवाना झाला. अर्थात या संघाचे नेतृत्व नेहमीप्रमाणे महेंद्रसिंह धोनीकडे असल्याने आणि झहीर-हरभजन-गंभीर या यशदायी त्रिमूर्तीचेही पुनरागमन झाल्यामुळे अखेर जित भारताचीच झाली, खरे तर झिंब्बाव्वेत विजयी झाल्यामुळे उत्साह व मनोधैर्य वाढलेला यजमान श्रीलंका संघ, वादळी शोएब अख्तर व अनुभवी शोएब मलिकच्या उपस्थितीमुळे दबदबा वाढलेली पाकिस्तानचा चमू आणि



अनपेक्षित ‘अपसेटस्’ घडविण्यासाठी प्रसिद्ध असलेले बांगलादेशी खेळाडू यांचे कडवे आव्हान मोडून काढणे वाटते तेवढे सोपे नव्हते, परंतु सेहवाग, दिनेश कार्तिक, गंभीर, रोहित शर्मा व खुद्द कर्णधार धोनी यांची जबाबदार फलंदाजी आणि झहरी-हरभजन-नेहराची भेदक गोलंदाजी यांच्या बळावर भारताने त्यात यश मिळवित तब्बल पंधरा वर्षानंतर प्रथमच ‘आशिया करंडक’ जिंकला. यापूर्वीच्या सलग दोन स्पर्धांत श्रीलंकेचा संघ विजयी ठरला होता आणि दिलशान, जयवर्धने-कापुगेदार, मलिंगा व मॅथ्युज हे त्यांचे सारेच बडे खेळाडू फॉर्ममध्ये असल्याने यावेळी विजेतेपदाची हॅटट्रिक करण्याची दुर्मिळ संधी यजमानांना निश्चितच होती. परंतु अंतिम लढतीत भारताने ६ बाद २६८ धावा केल्यानंतर श्रीलंकेचा डाव १८७ धावांतच गुंडाळला गेला आणि क्रिकेटमधील अनिश्चितता म्हणजे काय हे पुन्हा एकदा सर्वांच्या प्रत्ययास आले.

अख्तर व मलिक या दोन्ही शोएबांचे पुनरागमन पाकिस्तानच्या संघासाठी तसे अजिबात लाभदायक ठरले नाही. त्यांच्या खेळातील कसर कर्णधार शाहिद आफ्रिदीने दोन झंझावाती शतकांच्या सहाय्याने भरून काढण्याचा प्रयत्न केला खरा, पण सलामीवीर सलमान बट्टचा सन्मान्य अपवाद वगळता बाकी कोणाचीच फारशी साथ न लाभल्याने अखेर पाकचे आव्हान उपांत्य फेरीतच संपुष्टात आले.

श्रीलंकेविरुद्ध आफ्रिदीने फक्त ६० चेंडूत ठोकलेल्या १२४ धावा आणि भारताविरुद्ध श्रीलंकेच्या मध्यमगती माहरुफने नोंदविलेली हॅटट्रिक ही या स्पर्धेची दोन ठळक वैशिष्ट्ये ठरली. अर्थात सांघिकदृष्ट्या सर्वाधिक सरस खेळ भारतीय क्रिकेटपटूंकडूनच झाल्याने विजयश्रीची माळ त्यांच्याच गळ्यात पडली. या विजयामुळे झिंबाब्वेतील अपयशाची बोच तर कमी झाली आहेच पण श्रीलंकेतील आगामी कसोटी मालिकेसाठी नव्या उत्साहाने सज्ज होण्याचे बळही धोनी आणि कंपनीस अनायासेच प्राप्त झाले आहे.

## दक्षिण आफ्रिकेचा ‘व्हाइट वॉश’!

ट्वेंटीट्वेंटी विश्वकरंडक स्पर्धेत फ्लॉप ठरलेल्या दक्षिण आफ्रिका संघाने वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर मात्र चांगलेच यश मिळविले असून, ख्रिस गेलच्या नेतृत्वाखालील यजमान संघास एक दिवसी सामन्यांप्रमाणे कसोटी मालिकेतही पूर्णपणे पराभूत केले आहे.

एक दिवसीय सामन्यांच्या मालिकेत द. आफ्रिकेतर्फे सर्वाधिक यशस्वी ठरला तो हशीम आमला!


हशीम आमला

त्याने तीन शतके झळकावून आपल्या संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला होता, अर्थात त्याला कर्णधार स्मिथ, जुनाजाणता कॅलिस, जलदगती स्टेन आणि डीव्हीलर्स व मॉर्केल यांची सुरेख साथ होतीच. या सर्व खेळाडूंनी आपली घोडदौड तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतही कायम राखली व वेस्ट इंडिजला २-० असे दणदणीतरीत्या पराभूत केले चंदरपॉल व काही प्रमाणात ब्रॅडन नॅश व डवेन ब्राव्हो यांचा उत्तम


ब्राव्हो


चंदरपॉल

खेळ वगळता या मालिकेत वेस्ट इंडिजचे बहुतेक सर्व खेळाडू साफ अपयशी ठरत असताना द. आफ्रिकेतर्फे स्मिथ-कॅलिस-डीव्हीलर्स यांनी शतकांची रास रचली तर जलदगती स्टेन-मॉर्केलप्रमाणे फिरकी गोलंदाज बोथानेही प्रभावी मारा केला. त्यांच्या झकास कामगिरीमुळे पाहुण्यांनी पहिली कसोटी १६३ धावांनी तर तिसरी अखेरची कसोटी ७ गडी राखून जिंकली. दुसरा सामना अनिर्णित राहिला. तो मुख्यः बुजुर्ग चंदरपॉलच्या १६६

धावांमुळे. त्याला नॅशच्या शतकाची साथ मिळाल्यामुळे द. आफ्रिकेच्या ६ बाद ५४३ धावसंख्येस सर्वबाद ५४६ असे चोख प्रत्युत्तर वेस्ट इंडिजचा संघ तेथे देऊ शकला. अन्यथा ही मालिका ३-० अशा फरकाने हरण्याची नामुष्की त्यांच्यावर ओढवली असती, हे निश्तिच.

## इंग्लंडने ऑस्ट्रेलिया नमविले

रिकी पाँन्टिंगच्या नेतृत्वाखालील ऑस्ट्रेलिया संघ सध्या पाच एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेनिमित्ताने इंग्लंड दौऱ्यावर आहे. या मालिकेतील पहिले तिन्ही सामने इंग्लंडने जिंकल्यानंतर पॉन्टिंग-क्लार्कच्या समयोचित खेळाच्या बळावर ऑस्ट्रेलियाने चौथ्या सामन्यात डाव उलटविला आहे. परंतु मालिकेचा निकाल लागल्यानंतर त्या संघाचे हे सावरणे त्याच्या लौकिकास शोभणारे नाही, असेच कोणीही म्हणेल. इंग्लंडच्या विजय मालिकेचे श्रेय कर्णधार स्ट्रॉस व कॉलिंगवुड यांच्या सुरेख फलंदाजीप्रमाणे ब्रॉड-स्वान-अंडरसनच्या अचूक गोलंदाजीसही जाते. त्यांना ऑस्ट्रेलियाकडून वॅटसन-क्लार्क-टेट व बालिंगर यांनी चांगले प्रत्युतर दिले पण एकूण सांघिक कामगिरीत ऑस्ट्रेलियाचे बाकी सारे खेळाडू यावेळी तरी खूपच कमी पडले हे निश्चित.



## सायना नेहवालची कमाल!

भारताची अव्वल बॅडमिंटनपटू सायना नेहवालने या महिन्याभरात इंडियन ओपन (चेन्नाई)- सिंगापूर सिरीजद व इंडोनेशियन ओपन या तीन स्पर्धांची अजिंक्यपदे पटकावून अक्षरशः नवा इतिहास घडविला आहे. या तीनपैकी शेवटच्या इंडोनेशियन स्पर्धेत चीनच्या एकाही अव्वल खेळाडूने भाग न घेतल्याने सायनाचे काम थोडे सोपे झाले होते, पण अन्य दोन्ही स्पर्धांत चिनी प्रतिस्पर्ध्यांचाही मुकाबला यशस्वीपणे करून तिने आपला दर्जा निर्विवादपणे सिद्ध केला आहे. विजेतेपदांच्या या आगळ्या 'हॅटट्रिक'मुळे आता जागतिक क्रमवारीत सायना तिसऱ्या क्रमांकावर पोचली असून, यापुढील काळात ऑलिम्पिकच्या विजेतेपदास गवसणी घालण्याची उमेद ती बाळगून आहे. अंगभूत क्रीडाकौशल्यास अथक मेहेनत, जबर जिद्द व असाधारण सातत्याची जोड देऊन सायनाने आजवर जे अफाट यश मिळविले आहे ते पाहात तिचे वर्णन '... यासम ही' असेच करावे लागेल. ही युवती म्हणजे भारतीय क्रीडाक्षेत्रास लाभलेली नवी चमकदार तारका आहे, यात शंकाच नाही.

## मास्टर चंदगीराम यांचे निधन

भारतीय कुस्तीक्षेत्राचे भूषण म्हणून ओळखले जाणारे मा. चंदगीराम यांचे नुकतेच निधन झाले. आपल्या चार दशकांहून अधिक काळाच्या पौरुषपूर्ण कारकिर्दीत 'भारतकेसरी' पासून 'महाभारत केसरी'पर्यंत आणि 'भारतभीम' पासून 'रुस्तुम-ए-हिंद' पर्यंत अनेक मानाचे किताब पटकावणाऱ्या या कुस्तीगीराने आयुष्याच्या उत्तरार्धात कुस्तीचा आखाडा महिलांसाठी खुला करून एक वेगळीच कामगिरी बजावली. विशेष म्हणजे हे क्रांतीकारी पाऊल उचलताना त्यांनी प्रथम स्वतःच्या तीन मुलींनाच अव्वल कुस्तीगीर बनविले आणि आपल्या टीकाकारांची तोंडे बंद केली. Man with the Strongest Arms म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या क्रांतदर्शी कुस्तीगीराचा केंद्र सरकारने 'पद्मश्री' व 'अर्जुन पुरस्कार' देऊन यथोचित गौरव केला होता.




नदाल

# 'फ्रेंच ओपन'वर राज्य नदालचेच

आंतरराष्ट्रीय टेनिस क्षेत्रात गेला अर्धदशकाहून अधिक काळ विजेतेपदाची मक्तेदारी राहिली आहे ती रॉजर फेडरर, रफा नदाल आणि अमेरिकेच्या बलदंड विल्यम्स भगिनींची! यावर्षी मात्र फ्रेंच ओपनमध्ये पुरुष गटात विश्वविक्रमवीर फेडररचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. मात्र नदालने अंतिम फेरीत सोदरलिंगचा ६-२, ६-२, ६-४ असा सरळ पराभव करीत 'रोलॉ गॅरोस' वरील पाचवे विजेतेपद जिंकले. संपूर्ण स्पर्धेत एकही सेट न गमावणारा हा पिळदार शरीरयष्टीचा युवक गेल्यावर्षी शारीरिक दुखापती व कौटुंबिक आघाडीवरील ताण-तणावांमुळे बराच निस्तेज झाला होता. पण यंदा क्ले कोर्टवरील सर्व स्पर्धा तर त्याने आरामात जिंकल्या आहेतच पण आता 'विंबल्डन' ही पुन्हा एकवार जिंकण्याची सुसंधी त्याला आहे. नदालचा झपाटा असा वाढत असताना आजवर अजिंक्य मानल्या जाणाऱ्या फेडररची कारकीर्द मात्र उतरणीला लागली असून, फ्रेंच ओपन पाठोपाठ विंबल्डनमध्येही त्याला उपांत्यपूर्व फेरीतच पराभूत व्हावे लागले आहे. गेल्या आठ महिन्यात अक्षरशः एकही स्पर्धा जिंकू न शकलेला हा महान खेळाडू आजही वयाच्या तिशीतच आहे. परंतु नदाल व अन्य ताज्या दमाच्या युवा खेळाडूंचे कडवे आव्हान तो आता फार काळ पेलू शकेल असे वाटत नाही. अर्थात When the goind gets though, the tough gets going याचा सुखद प्रत्यक्ष आणून देण्याची क्षमता त्याच्याकडे निश्चितच आहे हे विसरून चालणार नाही. यावर्षी 'फ्रेंच ओपन'च्या महिला गटाचे विजेतेपद इटलीच्या फ्रान्सिस्का झियावोनीने पटकावले. अंतिम लढतीत ऑस्ट्रेलियाच्या सामंथा सोस्तुरला ६-४, ७-६ असे नमवून तिने Oldest woman to win the Grand Slam trournament बनण्याच्या पराक्रम गाजविला आहे. विजेत्या-उपविजेत्यांची ही दोन नवी नावे पुढे येत असताना सेरेना व व्हीनस या विल्यम्स भगिनींना उपांत्यपूर्व फेरीतच बाद व्हावे लागले तर यापूर्वी ही स्पर्धा चार वेळा जिंकणारी जस्टिन हेनिन चौथी फेरीही ओलांडू शकली नाही. फ्रेंच ओपनमध्ये नेहमीप्रमाणे भारताची मदर होती ती महेश भूपती व लिएंडर पेस या अनुभवी वीरांवरच. त्यापैकी पेसने डॉल्चीच्या साथीत पुरुष दुहेहीची अंतिम फेरी गाठली खरी पण तेथे त्यांना निनाद झिमोनिक-नेस्तोर जोडीकडून पराभूत व्हावे लागले. हा सामना जिंकला असता तर पेसच्या ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदांची संख्या बारावर गेली असती. आता ते लक्ष्य तो 'विंबल्डन'मध्ये गाठतो का ते पाहायचे!


फेडरर



# सारे जग 'फुटबॉल मॅनिया'मय...

*वार्षिक वेळात्रपकानुसार सध्या सर्व छोट्या-मोठ्या खेळांच्या आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय स्पर्धा सुरू असल्या तरी प्रारंभी म्हटल्याप्रमाणे साऱ्या जगाचे लक्ष केंद्रित झाले आहे ते दक्षिण आफ्रिकेतील मैदानांवर चढत्या श्रेणीने रंगत चाललेल्या फुटबॉलच्या विश्वकरंडक स्पर्धेवरच! जगभरातील सर्वोत्तम बत्तीस संघांचा सहभाग असलेली ही चौसष्ट रोमहर्षक सामन्यांची स्पर्धा म्हणजे 'Greatest sporting show on Earth' असे म्हटले तर ते अजिबात अतिशयोक्तीचे ठरणार नाही. अर्थात आत्तापर्यंत झालेले बहुतेक सर्व सामने चुरसपूर्ण, झंझावाती खेळापेक्षा रेफरी व लाइन्समेनच्या सदोष निर्णयांमुळेच अधिक गाजले आहेत, हे दुर्लक्षून चालणार नाही. फूटबॉलच्या तुलनेत क्रिकेट व टेनिससारखे खेळ कितीतरी संथ पण पंचांच्या चुकीच्या निर्णयांचा फटका कोणालाही बसू नये म्हणून तेथेही 'ॲक्शन रिप्ले' व 'रेफरल सिस्टीम' लागू केल्या गेल्या आहेत. आंतरराष्ट्रीय फूटबॉल क्षेत्राचे नियंत्रण करणाऱ्या 'फिफा'च्या धुरिणांनी मात्र अद्यापतरी या आवश्यक सुधारणांकडे पाठ फिरवली असून, त्याचा फटका यंदा ब्रिटन व मेक्सिकोसारख्या बलाढ्य संघांना बसला आहे. 'ह्युमन एरर्स' हा कोणत्याही खेळाचा अविभाज्य भाग असून, त्यामुळे खेळाची रंगत दुणावते, असे मानणाऱ्यांची संख्या बरीच मोठी असू शकते. परंतु या अंगभूत दोषामुळे एखाद्या उत्तम संघास विश्वकरंडक स्पर्धेतून बाद व्हावे लागणे केव्हाही असमर्थनीयच ठरते. यंदाच्या स्पर्धेत पंचांकडून झालेल्या चुकांबद्दल 'फिफा'च्या अध्यक्षांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. परंतु यापुढील काळात अशा चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी काही ठोस पावले टाकली जाणार का, हे मात्र त्यांनी अद्यापतरी स्पष्ट केलेले नाही. यंदाची स्पर्धा आता अखेरच्या टप्प्यात पोचली असून, ब्राझील-अर्जेंटिन-नेदरलँड-उरुग्वे-घाना-जर्मनी-स्पेन व पॅराग्वा हे आठ सर्वोत्तम संघ उपांत्यपूर्व फेरीत दाखल झाले आहेत. अखेर विजेतेपदाचा मुकुट त्यापैकी कोणाच्या डोक्यावर विराजमान होणार, याकडे जगभरातील तब्बल २३२ देशांच्या क्रीडारसिकांच्या नजरा खिळून आहेत.*